१७ जुलै १९७१ | पन्नास पैसे

# साधना



भिसे गुरुजींना सरकारने 'पद्मश्री' पदवी सन्मानपूर्वक देऊ केली ती त्यांनी 'Nothing doing' या दोनच शब्दांनी दूर सारली.

| | | | |
|---|---|---|---|
| माणूस | शनिवार | १७ जुलै, १९७१ | पन्नास पैसे |
| वर्ष | अंक | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| अकरा | सात | पंचवीस रुपये | पंचेचाळीस रुपये |

# माणूस

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

## सप्रेम नमस्कार...

□ आपला २६ जूनचा अंक वाचला. रविंद्र पिंग्यांचे सदर नेहमीप्रमाणे उत्सुकतेने वाचले. तेंडुलकरांचा परिचय आधीही दोन-तीन वेळा वाचला होता, परंतु या लेखाची शान वेगळीच होती. तो लेख वाचल्यावर इतर अंक वाचावयाची इच्छाच झाली नाही, हृदय हेलावले गेले. पिंगे आपल्या नायकाबरोबर वाचकांसही नेतात. डी. जीं. चे थोरपण वाचन जीवन जगणे ही एक कला आहे असे वाटते.

१० जुलै, १९७१ — जोशी ल. ब., जळगाव

□ दि. २५–५–७१ च्या दैनिकातून अनिल बर्वे यांना नक्षलवादी पत्रके छापल्याच्या आरोपावरून अटक झाल्याचे समजले. मनाला कुठेतरी चुटपुट लागून राहिली. नक्षलवादी म्हणून आजपर्यंत जे पकडले गेलेले आहेत ते सर्व तरुण आहेत, सुविद्य आहेत. सुशिक्षित आहेत. जीवनाबद्दलचं खूप औत्सुक्य बाळगून जगता येण्यासारखं त्यांचं वय आहे. तरीही हा वनवास ते का पत्करत आहेत? बंगाल बिहार आंध्र-मध्ये पकडल्या गेलेल्या नक्षलवादी तरुणांची परिस्थिती काय सांगते? महाविद्यालयीन तरुण शिक्षण अर्धवटच सोडतात, कोणत्याही प्रकारची शस्त्रे चालविण्याची माहिती नसताना हातात शस्त्र घेऊन भूमिगत होतात, लढण्यापूर्वीच उपासमारीने, आजाराने मरतात. एवढी कडवी भूमिका ते कशी घेऊ शकतात? वैयक्तिक

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

स्वार्थासाठी तर खास नाही. स्वार्थ साधण्यासाठी इतकी गंभीर जीव घेणारी परिस्थिती ओढवून घेण्याची आवश्यकता नाही हे का त्यांना समजत नसेल? कारण स्वार्थ साधण्यासाठी जगातील कोणत्याही देशात जितके मार्ग व साधणे उपलब्ध नसतील तितके आपल्या देशात आहेत हे ओळखण्या इतके निश्चितच ते हुषार आहेत. देशाला बदनाम करावयाची त्यांची इच्छा आहे म्हटलं तर देश आतापर्यंत इतरांनी काय कमी बदनाम केला आहे? त्यात भर घालण्यासाठी आपल्या आयुष्याचा सर्वनाश करून घेण्याऐवजी, इतर अन्य मार्गाने देशभक्त, राष्ट्रवादी म्हणवून घेत सुद्धा, राष्टाला बदनाम करता येते, हे देशभक्तीचं सरळ सूत्र त्यांना समज नसेल का? तरीही जीवनाची राखरांगोळी करणारा हा खडतर मार्ग ते का पत्करतात? त्याला माओची प्रेरणाही पूर्णता कारणीभूत नाही.

## हो-चि-मिन्हने चीनची कॉपी केली नाही

सामाजिक आर्थिक विषमतेचे दैनंदिन जीवनात ज्या प्रखर वेदना त्यांना व त्यांच्या सभोवतालच्या जगाला भोगाव्या लागतात त्या वेदना त्यांचे मन अशा प्रकारच्या त्यागासाठी कणखर बनवत जातात. बंगालमध्येच का प्रथम नक्षलवाद जन्म घेतो, बिहारमध्येच का टिकाव धरू शकतो, आंध्रमध्येच त्याचा का भडका उडतो, यावरून त्यामागची पार्श्वभूमी स्पष्ट होते. मग याला जबाबदार कोण? याला जबाबदार प्रचलित आर्थिक व्यवस्था, जनतेच्या कल्याणाचे खोटेपणाने बकवाज करणारे शासन, सत्ताधारी पुढारी जे स्वतःला समाजवादी म्हणवून घेतात पण कृती मात्र समाजवादाच्या मार्गातला अडथळा. गांधी, नेहरूंसारख्या थोर विभूतीचा वारसा सांगितला जातो, पण कृती मात्र त्यांच्या आत्म्याला यातना देणारी.
देश स्वतंत्र झाला त्याच वेळी विनोबाजींनी बजावून सांगितले होते, की लोकशाही म्हणजे केवळ सत्तेचे विकेंद्रीकरण नव्हे, तर ते भांडवलशाहीचेसुद्धा विकेंद्रीकरण ठरले पाहिजे. पण झाले उलट. आम्ही फक्त लोकशाही यंत्रणा स्वीकारली. लोकशाही मूल्य नाही. 'गरिबी हटाव'सारख्या लोणकढ्या घोषणांनी सुखासाठी आसुसलेल्या जनतेचे मत मिळवून निवडणुका जिंकता येतात, पण सुखासाठी आसुसलेल्या मनाची तृप्ती करता येत नसते. त्यासाठी हवा असतो नेत्याचा निस्सीम त्याग, देशाच्या आर्थिक व्यवस्थेत गरिबांना प्रमुख स्थान, हवी असते सत्तेऐवजी सेवेची तयारी. पण या घोषणांचे आद्य पुरस्कर्तेच आपल्या स्वतःच्या शेतात खपणाऱ्या नोकरांना पोटभर खाण्याइतकेसुद्धा वेतन देत नाहीत, देशात असंख्य तज्ज्ञ तरुण बेकार असताना जे फक्त स्वतःच्या मुलाचे मात्र कल्याण पाहतात. देशात असंख्य भूमिहीन असतानासुद्धा जे जादा जमीन आपल्या बायकांच्या नावावर घेऊन द्राक्षाच्या बागा पोसतात. तरीही ते स्वतःला गरिबांचे कैवारी म्हणून मिरवितात.

त्यांना गरिबांचे कल्याणकर्ते पुढारी म्हणावयाला मन तयार होत नाही. त्यांना खरे तर व्यापारी म्हणायला हवे. पण व्यापारी थोडे का होईना, आपल्या धंद्याशी प्रामाणिक असतात. कारण ते धंद्यात स्वतःची थोडी का होईना, पुंजी घालतात, काळ्या बाजारासाठी का होईना, पण थोडा तरी घाम गाळतात. पण हे राजकीय व्यापारी जनतेचे कल्याण करण्याचा बकवाज हे त्यांचं भांडवल. घाम गाळण्या-ऐवजी त्यांनी स्वतःच निर्माण केलेला कायदा उपलब्ध असतो. हे पुढारी सर्व पाप करतात ते त्यांनी निर्माण केलेल्या कायद्याच्या चौकटीत राहून. पुढाऱ्याकरता कायद्यापेक्षा नैतिकता महत्त्वाची असते हे त्यांना मान्य आहे का? आणि हेच 'मोफत का चदन घीस मेरे लाल'च्या जातीचे पुढारी आशा अराजकाला कारणीभूत आहेत.

देशाच्या प्रगतीसाठी, जनतेत त्यांच्या हक्कासाठी निर्माण झालेला असंतोष किंवा त्यांनी आरंभिलेली क्रांती उपयुक्त असते का? निश्चित उपयुक्त असते आणि आज तरी या दोलायमान परिस्थितीत देश कोणत्याही मार्गाने खालपासून वरपर्यंत क्रांतीसाठी ढवळून निघणे आवश्यक आहे.

मग राजकीय पक्ष क्रांतीसाठी प्रखर भूमिका का घेत नाहीत? कारण त्यांना एकदम एवढी क्रांती नको आहे. क्रांती हवी आहे ती जुजबीच, स्वतःचे राजकारण टिकविण्याएवढीच.

वरील परिस्थितीचा विचार केल्यानंतर वाटावयाला लागते की, जनतेच्या कल्याणाच्या गप्पा मारीत जनतेचे शोषण करणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांपेक्षा समाजाचा, शासनाचा रोष पत्करून, खडतर जीवन भोगणारे, पण वैयक्तिक स्वार्थाला बळी न पडता प्रामाणिक राहिलेल्या नक्षलवाद्यांचा त्याग उजवा आहे. वैयक्तिक स्वार्थासाठी दहा वेळा पक्ष बदलणाऱ्यापेक्षा ज्यांच्या निष्ठा ज्वलंत आहेत.

तरीही ते कुठे चुकत आहेत? चूक एकच. माओचा आधार त्यांनी घ्यावयाला नको होता. देशाच्या प्रकृतीनुसार त्यांनी क्रांतीचा मार्ग पत्करायला हवा होता. प्रत्येक राष्ट्राचे काही चरित्र असते आणि ते ध्यानी घेऊनच क्रांतीचा मार्ग नव्याने शोधावा लागतो. तो उसनवार घेता येत नाही. लेनिन त्यांना निश्तिच आठवत असेल. त्याच लेनिनने क्रांतीची आयात-निर्यात करता येत नाही असा सिद्धांत सांगितला आहे. मार्क्सने सांगितली तशी क्रांती लेनिनने केली नाही. माओने चीनमध्ये कधी 'स्टॅलिन आमचा चेअरमन' अशी घोषणा होऊ दिली नाही. उलट त्याने खेड्यातील जनतेला सुसंघटितरीत्या उभी करून तिच्याकरवी शहरांना घेरून चीनमध्ये क्रांती घडवून आणली. व्हिएतनाममध्ये हो-ची-मिन्हने चीनची कॉपी केली नाही. पण भारतात मात्र 'माओ आमचा चेअरमन' अशी घोषणा हे नक्षलवादी करतात. त्या मार्गाने नक्षलवादी भारतीय जनतेत शोषणाविरुद्धचा असंतोष निर्माण करू शकणार नाहीत. फक्त दोन-चार पिढ्यांचा फुकट बळी मात्र जाईल.

मला येथे नक्षलवाद्याचं समर्थन मुळीच करावयाचे नाही. पण त्यांचा मार्ग चूक असला तरीही त्यांचा प्रामाणिकपणा, निःस्वार्थी वृत्ती व खडतर जीवन मार्ग पत्करण्याची तयारी हे गुण मात्र नाकारता येत नाहीत. म्हणूनच या त्यागी प्रामाणिक कष्टाची तयारी असलेल्या, पण योग्य मार्ग जवळ नसल्यामुळे दोलायमान परिस्थितीत सापडलेल्या तरुणांना योग्य मार्गाने शोषणाविरुद्ध लढण्यासाठी संघटीत केलं पाहिजे.

शेवटी मला स्पष्टपणे एवढेच सांगावसं वाटत, की नक्षलवाद्याचा मार्ग चूक आहे. पण जोपर्यंत आपण त्यांना योग्य तो क्रांतीचा मार्ग दाखविण्याचा प्रयत्न करीत नाहीत तोपर्यंत त्यांना चूक म्हणण्याचा नैतिक अधिकार आपल्याला काय?

१२ जुलै, १९७१ — पंडित आर्वीकर, लातूर

□ आपला २६ जूनचा 'माणूस' वाचला. नेहमीप्रमाणे अंक वाचून खुष झालो. विशेषतः त्यातील गजानन मेहेंदळेंचा मिहीर सेन यांचेवरील लेख फारच आवडला. मी स्वतः आणि माझे मित्र श्री. सेन यांच्या Explorers Club of India च्या Activities मध्ये Interested आहोत. परंतु त्यासंबंधीची अधिक माहिती मिळू शकली नाही. तेव्हा कृपया Explorers Club चा कलकत्त्याचा पूर्ण पत्ता कळविल्यास आभारी होईन.

९ जुलै १९७१ — श्री. रा. पावगी, पुणे

[ चेअरमन, यूथ फॉर बंगला देश, १४ एझरा मॅन्शन, कलकत्ता. तूर्त या पत्त्यावर पत्रव्यवहार करून 'Explorers Club' चा कायम पत्ता मागवून घ्यावा. —सं. ]

□ आपला दि. १९ जूनच्या अंकातील 'तो दिवस' हा लेख वाचला. आपले आवाहनही नजरेस आले. आपल्याप्रमाणे आमचीही सरहद्दीवर जायची प्रबळ इच्छा आहे. आपण या बाबतील काय सहकार्य करू शकाल ते कळविणे की नुसते इतराप्रमाणे खंटावर बसून शेळ्या हाकता हे पहावयाचे आहे. साहसी तरुणांची संख्या कमी नाही पण फक्त रस्ता न दाखविता कोरडे उपदेश करणारेच अनेक.

२५ जून — रमेश जाधव, कन्नड

[ बंगला देश मुक्तिसंग्राम साहाय्यक समितीचे काम पुणे येथे सुरू आहे. आपण त्वरित संपर्क साधावा. समितीचे कार्यालय, गायकवाड वाडा (केसरी) येथे आहे. आवाहन लेखक श्री. मेहेंदळे यांनी केलेले आहे. त्यांचा पत्ता—गजानन भास्कर मेहेंदळे : ४०।३० एरंडवणा, तपस्वी आश्रम, भोंडे कॉलनी, पुणे ४. —सं. ]

□ □ □

# आवाहन की निरोप ?

अर्थमंत्री यशवंतराव चव्हाण जे बोलतात ते अगदी तोलून मापून अशी त्यांची ख्याती आहे. एक शब्द इकडे नाही की तिकडे नाही. प्रत्येक शब्द योजून हेतु-पूर्वक टाकलेला असतो. त्यामुळे त्यांच्या बोलण्यातून अमुक एखाद्या विषयावर त्यांचे काय मत आहे हे जाणून घेणे कठीण होते. एकेका वाक्यातून अनेक अर्थ निघू लागतात. शब्दाचेही अर्थ मोठ्या सावधगिरीने लावावे लागतात.

मागील आठवड्यात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक यांच्या 'आवाहन' या भाषण संग्रहाच्या पुस्तकाचे प्रकाशन करताना श्री. चव्हाण यांनी जे भाषण केले ते म्हणजे श्री. चव्हाण यांच्या संदिग्ध, निसटत्या आणि वादपूर्ण वक्तृत्वाचा अस्सल नमुना होय. मुख्य मंत्री नाईक आजारी पडले होते. विदर्भातून मुंबईत आल्यावर थेट सेंट जॉर्जेस रुग्णालयात दाखल झालेले. त्यांना हृदयतज्ज्ञांनी तपासून केवळ थकवा आल्याने विश्रांतीचा सल्ला दिला होता. हॉस्पिटलमधून श्री. नाईक परस्परच या समारंभाला आले होते.

ही एक बाजू. दिल्लीत सध्या गडबड चालू आहे. राजस्थानात सुखाडियांनी राजीनामा दिला. त्यामागे इंदिरा गांधींची काय भूमिका आहे. याविषयी तर्कवितर्क सुरू आहेत. सुखाडियानंतर आता नाईकांची तर पाळी नाही ना अशा पृच्छायुक्त अफवा प्रसृत होत होत्या. ही दुसरी बाजू आणि तिसरी गोष्ट म्हणजे महाराष्ट्रातच १९७२ च्या निवडणुकीनंतरच्या मुख्यमंत्रीपदाची चर्चा. या तीन गोष्टींच्या पार्श्व-भूमीवर श्री. चव्हाण यांचे भाषण झाले.

श्री. चव्हाण यांच्या भाषणात अनेक वादास्पद वाक्ये होती. परंतु मुंबईच्या राजकीय वर्तुळात गरम चर्चेचा विषय बनलेली नमुनेदार वाक्ये अशी " राजकारण व राज्य सतत चालू राहत असते. राज्य कुणासाठी थांबत नसते. नाईक हे राज्या-वर नसले तरी त्यांची संगत व सोबत महाराष्ट्राला महत्त्वाची आहे. महाराष्ट्राचे ते एक कुटुंबप्रमुख आहेत. त्यांच्या सल्ल्याची महाराष्ट्राला नेहमीच गरज लागेल. श्री. नाईक ही आमची दौलत आहे. तेव्हा त्यांनी प्रकृतीचीही योग्य ती काळजी घेतली पाहिजे."

आता अनेकजण म्हणतात की यात काय. साधे भाषण आहे. तेवढेच जाणते म्हणतात की हे साधे भाषण नव्हे. यामध्ये श्री. नाईक यांना एक निश्चित इशारा आहे किंवा संदेश आहे.

आणखी काही म्हणतात की नेहमीच्या सवयीप्रमाणे श्री. चव्हाण यांनी सारे संदर्भ संदिग्ध ठेवले आहेत. एक वाक्य नाईकांना इशारा देणारे तर दुसरे वाक्य त्यांना दिलासा देणारे तर लगेच तिसरे वाक्य नाईकांच्या विरोधकांना हवेहवेसे वाटणारे.

भाषणाच्या आणखी एका मुद्यामध्ये श्री. चव्हाण यांनी नाईक यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या कारकीर्दीचा गौरवपूर्ण परामर्ष घेतला. निरीक्षक म्हणतात याचे काय कारण होते ? परामर्ष घेताना जणू काय यांची कारकीर्द संपत आली असा आवेग कशाला ? अशी पृच्छाही होती.

आता प्रश्न असा आहे की श्री. चव्हाण हे खरोखरच मनात एवढे विविध अर्थ ठेवन बोलतात की भाबडेपणे बोलून टाकतात आणि त्यातून उगाचच आपण सुकृतविकृत अर्थ काढण्याचे उपद्व्याप करीत बसायचे ? बोलणारा बिचारा बोलत बसतो आणि ऐकणारे फाटे फोडतात असे व्हायला नको. परंतु मुंबईत या भाषणावर जोरदार चर्चा चालू आहे हे निश्चित.

## शंकररावांचा 'क्लेम'

या चर्चेला पार्श्वभूमीही आहे. या समारभाच्या बऱ्याच आधीपासूनच या विषयाच्या अनुषंगाने विविध चर्चा, वावड्या, तर्क-वितर्क मुंबईत उठताहेत.

मध्यंतरी १९७२ च्या निवडणुकांनंतर मुख्यमंत्री कोण या विषयावर जोरात वाद चालू होते. या पदावर जोराचा क्लेम म्हणजे मराठवाड्याच्या शंकरराव चव्हाणांचा. परंतु श्री. चव्हाण फक्त महाठवाड्याच्या पाच जिल्ह्यांतच माहीत आहेत मराठवाड्याबाहेर त्यांचे कार्य नाहीं, प्रतिमा नाही. नेता म्हणून त्यांना स्वीकारणे जड जाईल अशी निमित्तें सांगून श्री. शंकरराव चव्हाण यांना बाजूला टाकण्याचा प्रयत्न होत आहे.

महाराष्ट्र कांग्रेसचे अध्यक्ष श्री. वसंतदादा पाटील हे आणखी एक इच्छुक. पण त्यांना शासकीय कामाचा अद्याप अनुभव नाही. त्यामुळे त्यांना एकदम एवढ्या मोठ्या जागेवर बसविणे कठीण होईल. त्यापेक्षा काही वर्षे त्यांना मंत्रीमंडळात कामाचा अनुभव देऊन नंतर त्यांना बढती द्यायला हवी असा विचार चालू असल्याचे समजत होते आणि मुख्यमंत्री श्री. नाईक व उपमुख्यमंत्री म्हणून श्री. वसंतदादा पाटील अशी योजना १९७२ नतर राहील अशी लक्षणे दिसत होती.

परंतु तेवढ्यात आणखी एक नवाच तारा क्षितिजावर येत असल्यासारख्या बातम्या आल्या. महसूलमंत्री श्री. हरि गोविंद वर्तक यांचीही वर्णी या जागेवर कदाचित बड्यांच्या भांडणामुळे लागू शकेल अशा बातम्या उठल्या. श्री. नाईक आणि श्री. वसंतरावदादा यांच्यात परस्पर समझोता झाला नाही तर वर्तक गादीवर बसतील अशी कडक सूचना देण्यात आल्याची अफवाही उठली. वर्तकांना प्रमोशन देण्यात दोन गोष्टी साधतात. एक म्हणजे वर्तक काही अद्याप एवढे बडे झालेले नाहीत. त्यामुळे काही वर्षे तरी ते हाताबाहेर जाऊन मोठे होण्याचा धोका कमी आणि दुसरे म्हणजे श्री. वर्तक कोकणातले. त्यामुळे कोणालाही मुख्यमंत्रीपदाची संधि देण्याचे श्रेय साधते.

महाराष्ट्रात अशी चर्चा चालू असताना दिल्लीत काही वेगळीच गडबड चालू असली पाहिजे. प्रधानमंत्री श्रीमती इंदिरा गांधींच्या मनात नाईकांविषयी सध्या काय योजना आहेत कुणास ठाऊक. सात-आठ महिन्यांपूर्वी संबंध चांगले होते. एक

सीमा-विषय सोडून दिला तर बाईंचा नाईकांवर चांगलाच विश्वास होता — म्हणजे अजूनही आहे. पण काहीतरी बदल झाले आहेत हे खरे. अकलूजच्या गाजलेल्या विवाहसोहळ्यामुळे की काय पण सध्या प्रधानमंत्री जरा नाराजच असल्यासारख्या बातम्या होत्या.

सुखाडिया, नाईक, श्यामाचरण शुक्ला आणि ब्रह्मानंद रेड्डी या घट्ट बसलेल्या काँग्रेस मुख्यमंत्र्यांना त्यांच्या जागांवरून हलविण्याचे प्रधानमंत्र्यांचे विचार असल्याचे सांगितले जात होते. याबाबतीत अजूनही वेगवेगळे तर्क आहेत. नाईकांना हलवायचे ते कशासाठी? प्रमोशनसाठी? नाईकांची त्याला तयारी आहे का वगैरे. ते काहीही असो. पण दिल्लीत या बाबतीत गंभीर विचार चालू असल्याच्या अफवा मुंबईत उठत होत्या. सुखाडियांच्या प्रकरणाने या अफवांना दुजोरा मिळत होता.

या विविध रंगी पार्श्वभूमीवर अर्थमंत्री चव्हाणांचे हे असे भाषण झाले म्हणून ही चर्चा. ७२ च्या निवडणुका जवळ आपल्यामुळे या चर्चेला अधिकच रंग प्राप्त होतो, वास्तविक पाहता मुद्दलात काहीही गडबड नसताना एवढ्याशा कच्च्या पायावर कल्पनेचे इमलेच्या इमले चढविणेही योग्य नव्हे. पण राजकीय चर्चेत तसे करावे लागते. त्याला इलाज नाही.

या निमित्ताने एका निरीक्षकाने असा काही एक मूलभूत मुद्दा उपस्थित केला की सारे चाट! तो म्हणाला, यशवंतराव हे बोलले हे खरे. परंतु त्यांच्या बोलण्यातून कोणता अर्थ नेमका निघेल हा काथ्याकूट करण्याइतपत अधिकार त्यांच्या वाणीत उरला आहे काय? आणि तेवढी मान्यता त्यांच्या वाणीला दिल्लीत आहे काय?

पहिल्या प्रश्नाला अनेकांचे उत्तर होय असेच येईल. दुसऱ्याचे माहीत नाही. पण महाराष्ट्राच्या राजकारणात यशवंतराव अजूनही मोक्याच्या जागी आहेत. या राज्याच्या राजकारणात तोल साधण्याचे काम अद्यापपर्यंत तरी त्यांनी केलेले आहे. पूर्वीएवढा अधिकार जरी त्यांना उरला नसला तरी अंतर्गत कलहामधून वाट काढण्याचे सामर्थ्य त्यांच्यात आहे. आणि या सामर्थ्याचा उपयोग करून घेण्यासाठी हे कलह सतत त्यांनी जळत ठेवले असा आरोप कोणी केला तर त्याला दोष देण्यात फारसा अर्थ नाही.

एवढे मात्र खरे की श्री. चव्हाणांच्या भाषणामुळे अनेक मंत्र्यांना वेगवेगळ्या प्रकारे गुदगुल्या झाल्या असल्या पाहिजे. निवडणुका जवळ आल्याचा हा परिणाम.

आगामी निवडणुकांचें दृश्य परिणाम तसे आतापासूनच दिसू लागले आहेत. टॅक्सीवाल्यांचा संप आणि महाराष्ट्र काँग्रेसने नाशिक शिबिरात नेमलेले अभ्यास गट ही ठळक उदाहरणे. या अभ्यासगटात ज्या चर्चा झाल्या आणि ज्या सूचना करण्यात आल्या त्या चाळून पाहिल्या की हा सर्व निवडणूक स्टंट आहे की काय अशी शंका येते.

या सूचना खरोखरच काँग्रेस सरकारने अंमलात आणल्या तर खरोखरच काँग्रेस पक्ष एक क्रांतिकारी संघटना ठरेल. मग इतर डाव्या पक्षांची गरजच भासणार

नाही. किंबहुना डाव्या पक्षांना खतम करण्याच्या उद्देशानेच तर या अभ्यास गटांची स्थापना झाली नाही ना असा संशय येतो.

अभ्यासगटांच्या चर्चामध्ये ज्या क्रांतिकारक सूचना झाल्या त्यांना अर्थातच चांगली प्रसिद्धी मिळाली किंवा प्रसिद्धी देण्याची व्यवस्था करण्यात आली. अजून या अभ्यासगटांचे अहवाल तयार व्हायचे आहेत. परंतु अभ्यासगटांच्या प्राथमिक चर्चांचा वृत्तांतही रोज बातमीदारांना बोलावून महाराष्ट्र काँग्रेसचे सरचिटणीस श्री. तुषार पवार अधिकृतपणे सांगत होते. हा स्टंट नव्हे तर काय !

वेगवेगळ्या गटांच्या चर्चांमध्ये पुढे आलेल्या सूचना म्हणजे भूमिहीन शेतमजुरांना किमान वेतन, स्त्रियांना अकरावीपर्यंत मोफत शिक्षण, झोपडपट्टीवासीयांसाठी गृहबांधणी, कामगारांच्या अनेक कल्याणयोजना वगैरे वगैरे साऱ्या क्रांतिकारी घोषणा. या सूचना कितपत गंभीरपणे केल्या गेल्या आणि स्वीकारल्या गेल्या कुणास ठाऊक. अभ्यास गटांचे अहवाल प्रसिद्ध झाल्यावर ते कळेल. श्रीमंत शेतकऱ्यांची पाठीराखी समजणारी महाराष्ट्र काँग्रेस असे क्रांतिकारी वळण घेणार असली तर ते कुणाला नको आहे.

या अहवालांवर चर्चा करून महाराष्ट्र मंत्रीमंडळ लगेच निर्णय घेणार आहे. तेव्हा कळेल हा निवडणूक स्टंट की कृतिशील प्रकल्प. तोवर गप्प बसलेले बरे. ◻

## अजगर फरारी आहे !

छे, ही काय लोणकढी थाप नव्हे ! मुंबईच्या अत्यंत गजबजलेल्या भागातून सर्वांच्या हातावर तुरी देऊन 'तो' एका मध्यरात्री काळोखात गुडूप झाला. २६ जूनची रात्र, 'वीरमाता जिजामाता भोसले उद्यान' म्हणजेच मुंबईचे एक आकर्षण असलेले प्राणीसंग्रहालय उर्फ 'राणीचा बाग' येथील संग्रहालयाचे अधिकारीवर्ग, नोकरचाकर, एवढेच नव्हे तर कदाचित साऱ्या प्राण्यांचे विश्व गाढ झोपी गेले होते. अशा वेळी तो कोणालाही थांगपत्ता लागू न देता अगदी गुपचूप पळाला. दुसऱ्या दिवशी सकाळी साऱ्यांची झोप उडाली ती मात्र कायमची.

२७ तारखेच्या सकाळी लक्षात आले की तीन अजगरांपैकी एकाने गुंगारा दिला आहे. झाले. साऱ्यांची तारांबळ उडाली. शोधाशोध सुरू झाली. आसपासची झाडी, झुडुपे, झाडांच्या ढोल्या, बागेतील जंगलासारखा भाग वगैरे ठिकाणी अगदी आजतागायत रात्रंदिवस कसून तपास चालू आहे पण ते महाशय अजूनही गुंगारा देऊन राहिलेत, तरी बरं गवत कापणे व इतर साफसफाई त्या आधीच सुरू झाली होती व अजूनही ती चालू आहे पण त्याचा थांगपत्ता नाही. प्राणीसंग्रहालयाच्या अधिकारी वर्गाला अजूनही उमेद आहे की केव्हातरी तो सापडेल. कदचित कसून शोध करून

पृष्ठ ५७ वर

रवींद्र पिंगे

# आचार्य भिसे

## एक समर्पित जीवन

माणसं सागरासारखी असतात. सागर सतत रूप पालटीत असतो. सहस्र रूपांनी तो आपल्याला भेटतो. काही माणसं सतत उफाळलेल्या सागरासारखी गाजत असतात. चर्चिल जन्मभर असाच गाजत होता. सातासमुद्रापलीकडे पसरलेल्या अंकित भूमीवर त्याने वर्षानुवर्ष पंजा ठेवला. तो ढिला झाल्यावर खंदा लेखणीबहाद्दर म्हणून त्याचा डिंडिम त्रिभुवनात घुमला. आजन्म गाजत राहिल्यानंतरच त्याने डोळे मिटले. काही माणसं किल्ल्याच्या तटावर आपटत राहाणाऱ्या सागरलाटांसारखी असतात. पाषाण झिजवीत राहाणं हेच त्यांचं काम. डॉक्टर लोहिया अशांपैकीच. जन्मभर त्या झुंजार योद्ध्याने कशावर ना कशावर आपलं डोकं आपटलं. हिटलर असो, गोव्याचा फिरंगी सालाझार असो, वा पंडित नेहरूंचा मुखवटा चढवलेला दिल्लीश्वर असो. डॉ. लोहियाने त्याला बेदिक्कत टक्करच दिली. काही माणसं पार ओहोटीला लागलेल्या चैतन्यहीन सागरपाण्यासारखी असतात. अस्ताला जाताना वीर सावरकरांची अवस्था अशी पाणी उलट्या दिशेने पालटल्यासारखी झाली होती. भरतीची हाव न धरता त्यांनी देहविसर्जन केलं. काही मंडळी चांदण्यात फुगोटीला आलेल्या सागरपाण्याप्रमाणे स्वतातच तृप्त असतात. डुचमळणं त्यांना माहीतच नसतं. कवि पु. शि. रेगे असेच स्वतःच्या स्वयंतृप्त वृत्तीच्या aristocracy त स्वतःपुरते गुंग असतात. काही उल्हसीत माणसं किनाऱ्यावरच्या सागरपाण्यासारखी फेसाळत असतात. ऑस्कर वाईल्ड हा अशांपैकी सदैव फेसाळत जग-

लेला प्रज्ञाशाली लेखक. तो जिथे जिथे गेला, तिथे तिथे हास्यविनोदाचा जादूचा खुळखुळा त्याच्यामागे घरंगळत गेला. हजरजबाबी संभाषणचातुर्याचा तर तो केवळ कित्ताच होता. तो पंक्तीला लाभतो कधी म्हणून घराघरातून प्रतिक्षा केली जायची. काही माणसं सागरासारखी अथांग असतात. जसे प्रचंडप्रज्ञ विनोबा. त्यांना पुरतं जोखायला हाताशी माप मिळत नाही. ह्याच्या उलट काही माणसं खाडीत घुसलेल्या सागराच्या चिंचोळ्या पात्रासारखी एकमार्गी भासतात. खाडीतलं पाणी सागराचंच असतं. सागराचे सगळे गुणधर्म त्यात असतात. पण खाडीच्या पाण्याला गाज नसते, खळाळ नसते, प्रमाथीपण नसतं. ते संथ, निरुपद्रवी दिसतं. धोपटमार्गी वाटतं. आचार्य भिसे काय किंवा आप्पासाहेब पटवर्धन काय, दोघेही तसे होते. धिमे, शांत, एकमार्गी, बरेचसे निरुंद. भंगीमुक्तीचं हार्दिक पण तर्कातील ध्येय कृतीत उतरवीत आप्पांनी स्वतःला गोपुरीत गाडून घेतलं. आचार्यांचा मार्ग वेगळा. गिरीजनांच्यात ते केवळ वसतिलाच नव्हे तर रक्त आटवायला गेले. आदिवासी सेवेचा दिप त्यांनी हातात घेतला. अखेरपर्यंत तो प्रज्वलीत होता. मात्र ह्या दोघा साधकांमध्ये सूक्ष्म फरक होता. गोपुरीचे आप्पा हे पूर्णपणे ईश्वरशरण होते. देवाच्या हातातलं ते स्वतःला बाहुलं मानीत. त्यांच्या अखेरच्या आजारात ते उरळी कांचनला निसर्गोपचारासाठी आले होते. सेवादलातले आमचे काही मित्र तिथे त्यांच्या समाचाराला गेले. निघतांना म्हणाले, ' बराय आप्पा, दोन चार दिवसांनी आपण परत भेटूच.' आप्पा हा शंभर हिस्से कोकणी प्राणी. विनोद पचवलेला. त्यांनी बाजूची पाटीपेन्सील घेतली नि उत्तरादाखल लिहिलं, ' मित्रांनो, दोन चार दिवसांनी आम्ही असू असं नाही आणि नसू असंही नाही !' ही हरिशरणता आचार्यांच्यापाशी होती असा लेखी दाखला नाही. देव-देव त्यांनी केला नाही. ते निरपेक्ष, पण तरबेज कारभारी होते. युगेयुगे अमानुष दास्यात दंडाबेडी होऊन गुदमरलेल्या आदिवासींचा हुंबरडा कानावर पडल्यामुळे जन्माचा बेचैन होणारा पहिला पांढरपेशा, हीच आचार्यांची ईयत्ता.

मुदलात आचार्य म्हणजे पांढरपेशाच. पनवेलजवळच्या साई गावाची ही भिसे मंडळी. आचार्यांचे वडील हे खोताचे कारभारी. चार मुलगे आणि एक मुलगी हा त्यांचा पसारा. आचार्य हे त्यातले एक. प्रथम ठाण्याच्या बी. जे. स्कूलात खारकर नावाच्या नातेवाईकांच्या आश्रयाने आणि नंतर मुंबईच्या विल्सन कॉलेजात स्वावलंबनाने त्यांनी शिक्षण घेतलं. आपली निराधार भावंडं घेऊन ते खेतवाडीतल्या व्यंकटेश्वर प्रेसच्या चाळीत राहायला आले. पैंच्या नाईट स्कूलात मास्तरकी, एरव्हीच्या वेळात शिकवण्या आणि फावल्या वेळात खेतवाडी नॅशनल लायब्ररीत अभ्यास करून संस्कृत आणि इंग्रजी विषयांतली पदवी संपादिली. पक्षिणीसारखा एका बाजूने संसार करायचा नि दुसऱ्या बाजूने शिक्षण पदरात पाडून घ्यायचं, हा पांढरपेशी कित्ताच आहे. नंतर ते शिक्षक होऊन ज्ञानदान करू लागले, हासुद्धा पांढर

पेशीच प्रकार. पहिल्या महायुद्धाच्या काळात, विशेषतः गोखले–टिळकांच्या तसबीरी जागोजाग दिसत असत त्या भाऊक काळात, हुशार विद्यार्थी पदवीचं मोरपीस टोपीला लावून हमखास शिक्षकाचा पेशा पत्करीत आणि टीचर्सरूममधल्या खूर्चीला कोट अडकवायला कायमचे मोकळे होते. माफक काम, माफक ताण, माफक ध्येयवाद आणि माफक दाम ह्यांची हमी मिळाली की संतुष्ट होणं हे पांढरपेशीय वैशिष्टय तेव्हापासूनचंच आहे. नामदार गोखल्यांच्या नावाने कुंकू लावून नेमस्त-शीर, म्हणजेच शिक्षकीय जीवनाला एकटक लागायचं आणि आहे ह्या संसाराचा पसारा वाढू नये, किंबहुना संसारपाश ध्येयवादाच्या आड येवू नयेत म्हणून आजन्म अविवाहीत राहायचं, ह्या दोन्ही गोष्टी पांढरपेशा वृत्तीच्या शंकर रामचंद्र भिश्यांनी पक्क्या केल्या. कदाचित, परळच्या आर. एम. भट हायस्कूलातच गोखले शिक्षणसंस्थेचं आजन्मपद स्वीकारलेल्या त्यांच्या व्यावसाईक आणि प्रापंचिक जीवनाची इतिश्री होऊन त्यांच्या पांढरपेशेपणावर मान्यतेचं शिक्कामोर्तब झालं असतं.

पण तसं व्हायचा योग नव्हता!

भिसे भटके होते. पुढे शिक्षक म्हणून रुळल्यावर तगड्या विद्यार्थ्यांना बरोबर घेऊन शे-दिडशे मैल पायी तुडविण्याच्या ते सहली काढायचे. डहाणूहून त्र्यंबकेश्वर मार्गे नाशिक, नाशिकहून जुन्नर मार्गे पुणे, आणि पुण्याहून परत डहाणू असे ते पायीपायीच भटकायचे. एकदा असेच ते रायगडावर गेले होते. वाटेत पायथ्याला पोलादपूरला थांबले. तिथे मिशनऱ्यांनी चालविलेल्या कुष्टधामाला त्यांनी भेट दिली. त्या कुष्टधामाच्या आवारात त्यांना एक थडगं दिसलं. त्यावर लिहिलेलं होतं, 'हा अमेरिकन मिशनरी हिंदी कुष्ठरोग्यांची सेवा करता करता १८३५ साली ईश्वरचरणी लीन झाला.' हे वाक्य वाचून भिसे थरारून गेले. भानावर आले. सातासमुद्रापलीकडचा माणूस नातंगोतं नसलेल्या हिंदी कुष्ठरोग्यांची सेवा करण्यासाठी कंपनी सरकारच्या त्या इतिहासजमा काळात भारतात येतो आणि ख्रिस्ताचं नाव घेऊन देह टाकतो नि आपण मात्र गिरणगावाच्या पलीकडे पाहात

---

वर्षारंभ अंकापासून कविता हे सदर सुरू झाले आहे. पुढील सहा महिने या सदरातून प्रसिद्ध होणाऱ्या कवितांची निवड पूर्ण झाली असल्याने यापुढे नवीन कविता पाठवू नयेत. त्या कवितेची व त्यासंबंधीच्या पत्रव्यवहाराची दखल घेणे जवळ जवळ अशक्य आहे, हे कृपया गृहीत धरावे. —संपादक

---

नाही, ह्याची त्यांना खंत वाटली. ते बेचैन झाले. आणि त्याक्षणीच त्यांनी निर्णय घेतला की आपलं पांढरपेशीपण खुंटीवर टांगून आपणही ईश्वरकृपेने प्राप्त झालेली जिंदगी, रानावनातलं भटकं शापित जीवन कसंबसं ओढून काढण्यातच पिचून जाणाऱ्या आदिवासी बांधवांच्या सेवेत वेचायची. भावनेच्या भरात असे विचार अनेक सहृदय तरुण करतात. पण त्या भावनेचा अंमल ओसरल्यावर मूळ खुंटा-पासून पांगतात. भिश्यांनीं मात्र स्वत:ला जन्मभर आदिवासी सेवेत पुरुन घेतलं

मुंबईच्या उत्तरेला पंच्याऐंशी मैलांवर, निसर्गशोभेत कारवारबरोबर सामना करू शकेल असं बोर्डी नावाचं हिरवंगार बागायती गाव आहे. गाव आदिवासी लोकांच्या फाटक्या वस्त्यांनी वेढलेला आहे. ह्या रमणीय गावात शाळेचे प्रमुख म्हणून भिसे वीस सालच्या जानेवारीत आले. सुरुवातीला तीन मुलं होती. शाळा बाबाजी पुरंदऱ्यांच्या पडक्या घरात सुरू झाली. ३१ साली स्वामी आनंदांनी गावात आपला गांधीआश्रम सुरू केला. कै. आत्मरामपंत सावे, चित्रेगुरुजी, ही त्यागी मंडळी शाळेला मिळालेलीच होती. ह्या सर्वांचे देशहिताच्या दृष्टीने मेतकूट सुरू झाले. ३१ साली भिसेसरांनी वर्गांत मुलांना खिडकीबाहेर बोट दाखवीत सांगितलं, ' जरी मी तुमच्यात असलो, तरी माझं चित्त त्या पलीकडच्या आदिवासी मंडळीत आहे. मी आयुष्यभर त्यांच्या सेवेचं काम करणार आहे. ' ते शब्द खरे झाले. कारण शाळेच्या आचार्यपदातून मोकळं झाल्यावर त्यांना निरोपादाखल पानसुपारी करणाऱ्या त्यांच्या चाहत्यांना त्यांनी लिहून कळवलं, ' मी कंटाळलो नाही, थकलो नाही, अडचणींना घाबरलो नाही आणि परिस्थितीमुळे वैतागलोसुद्धा नाही. काम बदलले आहे; बंद झालेले नाही. मी संन्यासी नाही. संसारी आहे. संसारी माणसाच्या सगळ्या भावना मला पूर्णपणे समजल्या आहेत. आणि त्यामुळे माझे जीवन पूर्णपणे सुखमय, समृद्ध व विशाल बनले आहे. या माझ्या सुखमय, समृद्ध व विशाल जीवनात उणेपणा, मलिनपणा, क्षुद्रता, कोणत्याही प्रकारचा अहंभाव, स्वार्थीपणा अद्याप शिरला नाही. यापुढेही तो शिरू नये, अशी दक्षता मी बाळगीन. याच वृत्तीमुळे मी लग्न केले नाही. मी बोर्डीत आलो तेव्हा एक बिछाना व कपड्यांची एक लहानशी पेटी घेऊन आलो. बोर्डीत आल्यापासून मी अनेक प्रकारची कमाई केली.पण या कमाईत चैतन्य आहे, विशालता आहे, रमणीयता आहे. दैवी-पणाचे तेज आहे. माझ्या इच्छेप्रमाणे अथवा देवाच्या आज्ञेने जेव्हा बोर्डी, किंवा हे जग सोडण्याचा प्रसंग येईल तेव्हा मजजवळची जडसंपत्ती वरच्याएवढीसुद्धा नसेल. पण मी मातबर आहे, की दैवीसंपत्तीची फार मोठी कमाई मी करून ठेवली आहे – आणखी तिच्यात मी शक्तिबुद्धीप्रमाणे यापुढेही भर घालू इच्छितो – तिचा वारसा मी मागिलांसाठी ठेवून जाणार. '

१९४० साली त्यांनी आदिवासी सेवा मंडळ स्थापून गिरीजनांची, विशेषत: वारली जमातीची दाद सनदशीर मार्गाने लावून देण्याला प्रारंभ केला. कम्यु-

निस्टांच्या लालबावट्याखाली आदिवासींमध्ये उभे असलेल्या परुळेकर दांपत्याला आचार्य भिसे हे उपरे वाटले. पण भुई धरून बसलेले आचार्य विचलीत झाले नाहीत. गेली सतत तीस वर्षं ते आदिवासी कल्याणासाठी झिजत होते. दरम्यानच्या काळात ४० साली त्यांनी उंबरगावला वैयक्तिक सत्याग्रह केला आणि येरवडा कारागृहाची हवा खाल्ली. बेचाळीसच्या स्वातंत्र्य संग्रामात त्यांना नाशिकच्या तुरुंगात डांबण्यात आलं होतं. त्यानंतरचं त्यांचं आयुष्य खाडीच्या पाण्यासारखं संथ, पण सदा वाहातं झालेलं दिसतं. चित्रे गुरुजींनी शाळेच्या कामाची जबाबदारी स्वीकारली. आचार्य आदिवासी सेवेकडे वळले. त्यानिमित्त त्यांना वय झालेलं असूनही सदैव भ्रमंती करावी लागे. सचिवालयात खेटे घालावे लागत. अर्जविनंत्या कराव्या लागत. पण ते कधीही कंटाळले नाहीत. आदिवासींसाठी खावटी कोठारांची उपयुक्त योजना त्यांच्याच पाठपुराव्यामुळे अंमलात आली. कोसबाडची सेवा केंद्रंही आचार्यांच्याच परिश्रमामुळे सुरू झाली. बोर्डीचा परिसर आणि संस्थेचे कार्य विठ्ठलराव घाटयांना इतकं आवडलं की सतत सहा वर्षं शिक्षकांची उजळणी शिबीरं त्यांनी बोर्डीलाच भरवली. ६० सालचं महाराष्ट्र सर्वोदय संमेलन त्यांच्या पुढाकारामुळेच बोर्डीला भरलं होतं. कस्तुरबा, वल्लभभाई, रविशंकर महाराज, ठक्कर बाप्पा वगैरे बोर्डीला प्रेमाने आले. भूदानकार्यातही त्यांनी शक्य तो हविर्भाग दिला. शारदाश्रमाची उभारणी तर सारी आचार्यांचीच. मध्ये वेळ मिळाला तेव्हा आदिवाशींच्या जीवनावर प्रकाश पाडणारी 'जंगलातल्या छाया' हीं कादंबरीही त्यांनी लिहीली. अशा ह्या कार्यरत आचार्यांना सरकारने 'पद्मश्री' पदवी बहुमानाने देऊ केली. ती त्यांनी 'Nothing doing' ह्या दोनच शब्दांनी दूर सारली. अनावश्यक वस्तूंचा संग्रह न करणारं ते हाडच वेगळं होतं. शेवटपर्यंत त्यांनी आपला भार कोणावरही पडू दिला नाही. परवा रुधिराभिसरणातला दाब कमीजास्ती होऊन वयाच्या शहात्तराव्या वर्षी त्यांनी अखेरचे डोळे मिटले. त्या अगोदर त्यांना थोडासा भ्रमाचा झटका आला. पण भ्रमातसुद्धा डोळे मिटून आचार्य आपल्या शाळेच्या प्रार्थनाच धडाधड म्हणू लागले! वरकरणी शांत-प्रशांत दिसणाऱ्या माणसांच्या अंतर्यामी काय खळबळ चाललेली असते ते अशाच वेळी कळतं; किंवा, कळत नाहीही. कारण, माणसं सागरासारखी अथांग असतात!



## झेकोस्लाव्हाकिया : सामान्य जनतेचं रुदन !

प्रागमध्ये झेकोस्लाव्हाक कम्युनिस्ट पार्टीचं १४ वे अधिवेशन पार पडून बरेच दिवस झाले. रशियन अध्यक्ष पॉडगॉर्नी ह्या समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. ह्या कम्युनिस्ट कॉंग्रेसनं झेकोस्लाव्हाकियात सारं 'सुरळीत' झाल्याबद्दल समाधान व्यक्तविलं. १९६८–६९ च्या उलथापालथीत, स्वोबोदा, नोव्होटनी आदींच्या विरोधात जाऊन, रशियाचं समर्थन करणाऱ्या गुस्ताव हुसक् ह्यांना प्रथम सचिवावरून 'प्रथम सचिव'पदाची बढती मिळाली. राजधानीत, रशियाचे १९६८–६९ मधील हस्तक्षेपाबाबत आभार मानण्याचा सोहळा चालू असताना, बहुसंख्य विद्यार्थी, कामगार, बुद्धिजीवी वर्ग ह्या सोहळ्यापासून अलिप्त होता. त्याबाबत उदास होता. दैनंदिन जीवनातलं त्याचं स्वातंत्र्य हिरावून घेतलं जात असल्याबद्दल तो त्रस्त होता. भयग्रस्तही होता. पाश्चात्य वृत्तपत्रातनं प्रकाशित झालेल्या ह्या वृत्तांना दुजोरा देणारं एका, झेकोस्लाव्हाक नागरिकाचं पत्र 'ली मॉण्डे' साप्ताहिकानं इंग्लिश आवृत्तीत प्रसिद्ध केलं. बव्हंशी सांस्कृतिक जीवनावर शासनानं केलेल्या अतिक्रमणाचंच पत्रलेखकानं वर्णन केलं आहे. तथापि, सामान्य जनतेचं हृदयही त्यात डोकावून जातं. त्याचं रुदन समजून येतं! पाश्चात्य राष्ट्रांतनं प्रसिद्धी मिळालेल्या ह्या निनावी पत्राचा गोषवारा पुढीलप्रमाणे आहे–

'आम्हा झेकोस्लाव्हाक जनतेला परदेशी वृत्तपत्रे–कम्युनिस्ट वा बिगर कम्युनिस्ट, उजवी वा डावी–कधीमधी चाळण्याची संधीही क्वचित् मिळून जाते. त्या वेळी खरोखरच असं वाटू लागतं की, जग झेकोस्लाव्हाकियाला विसरून गेलं आहे. इथे सर्व 'सुरळीत' आहे ह्याचा अर्थ तरी त्यांना कधी लागू शकेल का? इथल्या सामान्य जनतेच्या दैनंदिन जीवनात कम्युनिस्ट पार्टीचं सतत अतिक्रमण चालू असून दैनंदिन जीवनातलं स्वातंत्र्य झेकोस्लाव्हाक जनतेच्या हातनं हिरावन घेतलं जात आहे, हे कधी तरी बाहेरच्या जगाला समजू शकेल का?

'सांस्कृतिक क्षेत्राचंच आपण उदाहरण घेऊ या. क्रेज्का प्रकरण त्या दृष्टीनं उद्बोधक आहे. प्रागमधल्या झा झ्रानु ह्या थिएटरचा हा संस्थापक. १९६८–६९ च्या प्रकारानंतर, हा गृहस्थ शासनाला प्रागमध्ये नको होता. किंबहुना झेकोस्लाव्हाकियातही नको होता. आपलं थिएटर व नृत्यपथक सोडून जायला क्रेज्का ह्यांनी नकार दिला. परिणाम साहजिकच त्याच्या पदच्युतीत झाला. ह्या पदच्युतीविरुद्ध

झेकोस्लाव्हाक जनतेनं प्रखर निदर्शनं केली. ती दडपली गेली हे नव्यानं सांगायला नकोच... झेकोस्लाव्हाक शासनानं सध्या एकच नीती अवलंबिलेली दिसते—जनतेचा छळ! नागरिकांना अपमानास्पद वागणूक!! त्यांच्या सांस्कृतिक-नैतिक मूल्यांना पायदळी तुडवणं!!! ह्या संदर्भात, १९३९ ते ४५ चं जर्मन शासनही बरं म्हणायची घृणास्पद पाळी ह्या शासनानं आणलेली आहे. त्या वेळी निदान स्वतंत्र झेकोस्लाव्हाक अस्मिता तरी शाबूत होती! आमची नितीमूल्यं तरी लाथाडली गेली नव्हती!...

'अशीच कथा आहे झेकोस्लाव्हाकियातल्या व्होज्टेक् जेस्नी ह्या चित्रपट निर्मात्याची. ह्या सर्वोत्कृष्ट चित्रपट निर्मात्याला अलीकडेच झेकोस्लाव्हाकिया सोडून जावे लागले. त्याचा गुन्हा होता, झेकोस्लाव्हाकियन परिकथांवर आधारित चित्रपट काढण्याचा त्याचा इरादा! झेकोस्लाव्हाकिया सोडल्यावर पाठवलेल्या पत्रांतनं जेस्नी म्हणतो, '.. झेकोस्लाव्हाकियात आता परतणं म्हणजे गुलामगिरीत परतणं आहे. ही राजकीय, वैचारिक, मानसिक गुलामगिरी आता प्रत्येक झेकोस्लाव्हाक नागरिकांवर लादली जाईल!'

'.. झेकोस्लाव्हाकियन सेन्सॉर बोर्डानं तर झपाट्यानं लोकप्रिय नृत्यनाट्यांवर

---

## तेथे पाहिजेत जातीचे!

अमेरिकन राष्ट्राध्यक्ष रिचर्ड निक्सन ह्यांच्या कन्येचा नुकताच विवाह पार पडला. एका चर्चमध्ये, मुला-मुलीचे नातेवाईक व काही मित्रमंडळी अशा जेमतेम साडेतीनशे—चारशे लोकांच्या उपस्थितीत हा विवाहसमारंभ पार पडला. फार काय, पण वॉशिंग्टनमधल्या 'व्हाईट हाऊस'मध्येदेखील कुणाला ह्या विवाहसमारंभाची 'विशेष जाणीव' झालेली दिसून आली नाही! अमेरिकन शासन, सिनेट सदस्य वगैरेंची तर बातच सोडा!!

...ह्या बेटच्या भांडवलशाही राज्यांतल्या वरिष्ठ जागा अडवणाऱ्या लोकांना काही कळतच नाही! नेत्याच्या मुलीचा विवाहसोहळादेखील बेटे खाजगी मानतात! तो कसा समाजवादी असला पाहिजे!! समाजाच्या अगदी तळच्या थरापर्यंत त्याचे साद-पडसाद उठले पाहिजेत. प्रत्येक व्यक्ती—मग ती शासकीय नोकर, पोलीस, सैनिक कोणीका असेना—सक्रीय सहभागी झालीच पाहिजे! पण अमेरिकन भांडवलदारांना हे कुठलं समजणार? तेथे पाहिजेत जातीचे—भारतीय नवकाँग्रेसच्या समाजवादी खासदार—पुढारी—मंत्र्यांसारख!!

---

बंदी घालायला सुरुवात केली आहे. शेक्स्पीअरचं 'चौथा हेन्री' ही त्यातनं सुटलेलं नाही...एका प्रथितयश कलाकाराची ऐन कार्यक्रमाच्या वेळी हकालपट्टी नुकतीच झाली. त्याचं कारण काय तर म्हणे एका सुप्रसिद्ध टेलिव्हिजन कलाकाराप्रमाणे ह्या कलाकारानं आपल्या शर्टची कॉलर ठेवली होती. हा टेलिव्हिजन कलाकार सध्या तीन वर्षाची सजा भोगत आहे–१९६८–६९ मधल्या शुद्धिकरणाचा भाग म्हणून ! ...गेल्या वर्षी ब्रुसेल्स कम्युनिस्ट कॉंग्रेसच्या वेळी एक नृत्यनाट्याचा कार्यक्रम असाच ऐनवेळी रद्द करण्यात आला. ह्या नृत्यनाट्यात काम करणारे चार प्रमुख कलाकार 'ज्यू' होते. त्याच सुमारास रशियात 'ज्यू' विरोधी कारवाया सुरू असल्याने, 'ज्यू' कलाकारांच्या प्रमुख भूमिका असलेलं हे नृत्यनाट्य चालू देणं अर्थातच योग्य नव्हतं !

'...ह्या अवस्थेतही बुद्धिजीवी, विचारवंत लिहित आहेत. इथल्या परिस्थिती-बाबत आक्रंदून लिहित आहेत ! कामगार, विद्यार्थी टाहो फोडीत आहेत ! ! फक्त लिहिलेलं लिखाण प्रसिद्ध व्हायची शक्यता उरलेली नाही ! ! फोडलेले टाहो ह्या कैदेबाहेर कुणाला ऐकू जाणं शक्य नाही ! ! !'

**थोडे विषयांतर**: सिलोनमधील गेव्हारिस्टचे उठावात अटक झालेल्या एका तरुणाजवळ पंतप्रधान सिरीमाओ बंदरनायके स्त्रीसुलभ हत्यार काढून म्हणाल्या, "समजा, मी तुझी आई असते तर तू असं केलं असतं का ?"

तरुण ताडकन् म्हणाला, "तू माझी आई असतीस तर मी आज लंडन विद्या-पिठात असतो, ही पाळी आलीच नसती !"

श्रीमती बंदरनायकेचे तीन पुत्र सिलोनमध्ये विद्यापीठे असूनही लंडनमध्ये शिकत आहेत.

□ □ □


# व्होल्गा जेव्हा लाल होते

**ले. : वि. स. वाळिंबे**

**मूल्य : अठरा रुपये**

**राजहंस प्रकाशन**

सुशिक्षितांना अनेक प्रलोभनांना बळी पाडून आपलेसे करून,
त्यांच्यावर मानसिक गुलामगिरी लादणे...
समर स्कूल्स हा त्याचाच एक भाग.

# समर स्कूल्सच्या सुरस कथा

पी. एल्. ४८०, अमेरिकन सरकार, युनिव्हर्सिटी ग्रँण्टस् कमिशन व इतर काही संस्था यांच्या सौजन्याने भारतातील माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षकांना ते जो विषय शिकवतात त्या विषयाचे सखोल ज्ञान मिळावे यासाठी गेली काही वर्षे उन्हाळी वर्ग (Summer Schools) भरवली जात आहेत. या वर्गांच्या कार्याचा पुनर्विचार व्हावा व त्यात काही सुधारणा व्हावी हा लेखाचा उद्देश. 'माणूस'ने आतापर्यंत पी. एल्. ४८०, केअर (Care) वगैरे योजनांचा परामर्श घेतलाच आहे. हा विषय तसाच वाटल्याने हा प्रपंच करीत आहे. भारतातील सुशिक्षित वर्गास आपलेसे करून त्यांच्यावर मानसिक गुलामगिरी लादणे असा अमेरिकेचा नेहमीच प्रयत्न असतो. उन्हाळी वर्ग हा त्यातलाच एक भाग आहे. तथापि हा मुद्दा दृष्टीआड करून उन्हाळी वर्गांचे रास्त मूल्यमापन व्हावे.

साधारणतः प्रत्येक राज्यात प्रत्येक विषयासाठी माध्यमिक शिक्षकांसाठी निराळे व महाविद्यालयीन शिक्षकांसाठी निराळे असे वर्ग उन्हाळ्याच्या सुट्टीत सुमारे सहा आठवड्यांसाठी विद्यापीठातून किंवा निरनिराळ्या कॉलेजांतून भरतात. वर्गाचा संचालक (director) ज्या ठिकाणी वर्ग असतो त्या संस्थेतील त्या विषयाचा मुख्य असतो. त्याच्याबरोबर एक अमेरिकन शिक्षक सल्लागार (!) असतो. अलीकडे काय घडले कुणास ठाऊक, पण हे अमेरिकन सल्लागार कमी केले आहेत. याशिवाय संचालक सामान्यतः आपल्या खात्यातील काही शिक्षक व्याख्याते व प्रयोगशिक्षक (lecturers & demonstrators) सहाय्यक म्हणून घेतो. संचालकासुद्धा सर्वांना मानधन मिळते. वर्ग सुरू होण्यापूर्वी शाळा महाविद्यालयांना पत्रे पाठवून व वृत्त-

पत्रातून जाहिरात देऊन अर्ज मागविले जातात व त्यातून काहीजणांना आमंत्रण जाते. वर्गास येणाऱ्या विद्यार्थ्यांना (participants) येण्याजाण्याचे पहिल्या वर्गाचे भाडे (प्रसंगी विमानाचेही) व प्रवासखर्च मिळतो. वर्गाच्या काळात दैनिक भत्ता प्रत्येकी रु. २/–, रहाण्याची वसतीगृहात मोफत सोय व जेवण, नाश्ता, चहा यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यास प्रत्येक दिवशी ८–१० रुपयांपर्यंत मिळतात व काही शैक्षणिक सहली वर्गातर्फे असतात. याशिवाय कागद, वह्या, पेन्सिली व सुमारे १०० रुपयांपर्यंत त्या विषयातील पुस्तके प्रत्येक विद्यार्थ्याला मोफत दिली जातात. याप्रमाणे सर्व विद्यार्थ्यांची बडदास्त असते.

आपल्या संस्थेतील शिक्षकांनी जास्त शिकावे, त्यांचा दर्जा वाढावा अशी रास्त अपेक्षा संस्थाप्रमुखांची असते म्हणून ते जास्तीत जास्त शिक्षकांना उन्हाळी वर्गास जाण्याचा आग्रह करतात व क्वचित जाणे भाग पाडतात. कित्येकदा संचालक पुरेसे विद्यार्थी आले नाहीत तर कोणाही शिक्षकाला वर्गासाठी ओढतात. यंदाचीच गोष्ट. एक हंगामी शिक्षक नोकरीवरून कमी केल्यामुळे नोकरीच्या शोधार्थ विद्यापीठात गेले होते. त्याच वेळी एक संचालक विद्यार्थ्यांच्या शोधात होते. दोघांची गाठ पडली आणि बेकार शिक्षक वर्गात दाखल झाले. असेच आणखी एक विद्यार्थी कळवळून मला सांगत होते, 'यंदा माझे लग्न होणार होते पण काय करणार, प्रिन्सिपॉलनी ही शिक्षा दिली.' असे बरेच विद्यार्थी मनाविरुद्ध व सुट्टी बुडल्याच्या दुःखात वर्गासाठी येतात. या विद्यार्थ्यांसाठी काहीतरी अभ्यासक्रम आखला जातो. या अभ्यासक्रमाला कधीकधी आकर्षक नावे दिली जातात. एक वर्ग बी. एस्सी. पर्यंत नवीन पद्धतीने कसे शिकवावे हे शिकवण्यासाठी होता. जणू कसे शिकवावे हे वर्गातील शिक्षकांना ठाऊक नव्हते व त्याचा संचालक मंडळींना फार मोठा अनुभव होता. सामान्यपणे महाविद्यालयीन शिक्षकांसाठी एम्. एस्सी. चा अभ्यासक्रम व माध्यमिक शिक्षकांसाठी बी. एस्सी. चा अभ्यासक्रम ठेवलेला असतो. शिवाय बऱ्याच वेळा संचालकांच्या विषयावर जास्त भर दिला जातो. या वर्गाच्या काळात एकाददुसरी चाचणी परीक्षा घेतली जाते. या चाचणीत काहीही केले तरी त्याचा विद्यार्थ्याच्या नोकरीवर काहीच परिणाम होत नाही. वर्गाच्या काळाच्या शेवटी वर्गास हजर राहिल्याबद्दल समारंभपूर्वक प्रमाणपत्रे दिली जातात. संचालक विद्यार्थीवर्गाची व विद्यार्थी संचालकांची स्तुती करतात व घरोघरी परततात.

या वर्गास नियमितपणे हजर राहिल्याबद्दल, सर्व त्यातील कार्यक्रम व्यवस्थितपणे पार पाडल्याबद्दल नंतर मूळ संस्थेत परत गेल्यावर कोणत्याही प्रकारचा फायदा शिक्षकास मिळत नाही. तसेच काहीही व्यवस्थित काम न करता चुकारपणाने वेळ काढला तरी त्याबद्दल शिक्षाही मिळत नाही. अशा परिस्थितीत विशेषतः मनाविरुद्ध आलेल्या विद्यार्थ्यांचा दृष्टिकोन सहाजिकच चुकवाचुकवीचा असतो. अनेक उन्हाळी वर्गातील विद्यार्थी व्याख्यानाला येत नाहीत; प्रयोगाला दांड्या मारतात.

त्यांना शिक्षा म्हणून हजेरी घेतल्यास व्याख्यानाचे वेळी खुशाल झोपतात व प्रयोगाच्या वेळी टिवल्याबावल्या करून १५–२० मिनिटांत पळतात. यंदा एका उन्हाळी वर्गाच्या वेळी त्याच ठिकाणी एका चित्रपटाचे चित्रीकरण चालू होते. चित्रीकरणासाठी काही एक्स्ट्रॉं हवे होते. एक प्राध्यापक (वर्गाचे विद्यार्थी) दोन दिवस दांडया मारून एक्स्ट्रॉंचे काम करून आले. नंतर संचालकांना हे कळल्यावर त्यांनी सदर प्राध्यापकांना जामले व त्या दोन दिवसांचा दैनिक भत्ता कापला. प्राध्यापक महाशयांना यात फारसे दुःख झाले नाही. कारण दैनिक भत्त्यापेक्षा एक्स्ट्रॉंचा पगार जास्त होता. शिवाय चित्रपटात झळकायला मिळाले. बरेच विद्यार्थी केवळ मौज म्हणून वर्गासाठी येतात. सरकारी खर्चाने १–१॥ महिना मजेत काढायचा एवढाच उदात्त (!) हेतू ठेवतात व तो प्रांजलपणे कबूलही करतात. अशाच एका उन्हाळी वर्गाला एक बाई येताना आपल्या नवऱ्याला बरोबर घेऊन आली. तो नवरा विद्यार्थी नसतानाही संचालकांना त्या दोघांना एक खोली देऊन दीड महिना जावयासारखी सोय करावी लागली. दुसऱ्या एका उन्हाळी वर्गातील विद्यार्थ्यांनी एकमेकांत ठरवून जेवणाबद्दल फारच तक्रार केली. संचालकांनी कॉंट्रॅक्टर बदलला. पुन्हा तक्रार. याप्रमाणे २–३ वेळा झाल्यावर संचालक कंटाळले. त्यांनी जेवणाचे प्रत्येक विद्यार्थ्यास प्रतिदिनी रुपये ८ याप्रमाणे रक्कमच दिली व हवे ते बाहेरच जेवायला सांगितले. विद्यार्थ्यांना हेच हवे होते. सर्वांना १ रुपयाची राईसप्लेट आवडू लागली व प्रत्येकी शं-दीडशे रुपये परत जाताना घरी नेता आले. अशा अनेक सुरस गोष्टी लिहिण्याजोग्या आहेत.

आता संचालक व त्यांचे सहकारी याबद्दल. बऱ्याचशा संचालकांचा हेतू असे वर्ग चालवताना पैसे मिळवणे व स्वतःचा मोठेपणा वाढवणे यापेक्षा जास्त असतो असे मला वाटत नाही. अन्यथा अशा वर्गातून काहीही निष्पन्न होत नाही हे ठाऊक असूनही स्वतःचे व आपल्या सहकाऱ्यांचे संशोधन व इतर कार्य १॥–२ महिने बंद ठेवण्याचे काय कारण ? एका उन्हाळी वर्गाच्या संचालकांनी भाषणात प्रामाणिकपणे सांगितले की, "माझ्या मनात हा उन्हाळी वर्ग घ्यायचा नव्हते. कारण सर्व संशोधनकार्य २ महिने बंद रहाते. पण केवळ वरून दडपण आल्यामुळे मी हे काम घेतले आहे." संचालक आपल्या खात्यातील शिक्षक सहाय्यक म्हणून घेतात. यात वावगे काहीच नाही पण असे सहकारी सहाय्यक घेताना त्यांचे ज्ञान, त्यांचा व्यासंग तसेच त्यांची वागायची पद्धत याचा विचार व्हायला नको का ? यंदा एका उन्हाळी वर्गात एका शिक्षकांना त्यांना ज्या विषयातील काहीच माहिती नाही असा विषय व्याख्याने देण्यासाठी दिला. समोर बसलेल्या विद्यार्थ्यांत त्या विषयात पीएच्. डी. झालेले एक विद्यार्थी होते. ते उद्वेगाने मला म्हणाले, "अशी चुकीची माहिती असलेली व्याख्याने ऐकण्यापेक्षा खोलीवर जाऊन झोपलेले काय वाईट आणि अशा झोपणाऱ्या विद्यार्थ्यांविरुद्ध बोलायचा संचालकांना नैतिक काय अधिकार आहे ?

याच उन्हाळी वर्गात सर्वांच्या मते जवळजवळ सर्वच व्याख्यानें रद्द झाली एक व्याख्याते इतके उद्धटपणाने वागले की परत जाताना सर्वजण केवळ कटुताच घेऊन गेले. कारण विशेषतः हे व इतर व्याख्याते सदैव आपण स्वतः म्हणजे उच्च व वर्गासाठी आलेले शिक्षक हे हलके असे नेहमी जाणवून देत असत.

वर्गाचा अभ्यासक्रम ठरवताना वर्गाचे विद्यार्थी नेहमी ज्या पातळीपर्यंत विषय शिकवतात त्याहून फार तर थोडा जास्त ठेवावा. बऱ्याचवेळा उत्साहाच्या भरात बराच वरच्या पातळीचा विषय शिकवला जातो किंवा व्याख्याते आपल्या संशोधनाबद्दल जास्त बोलतात त्यामुळेही विद्यार्थी कंटाळतात. यावर्षी एका उन्हाळी वर्गास बरेच प्रयोगदर्शक (Demonstrators) आले होते. त्यांना पुढे कधीही विषय शिकवण्याचा प्रसंग येणार नव्हता. अशांना खूप वरच्या पातळीवरील क्लिष्ट व्याख्याने ऐकावी लागली.

उन्हाळी वर्गाचे स्वरूप स्थूलपणे असे असते. वर्गाच्या विद्यार्थ्यांकडून त्यांचे उन्हाळी वर्गाबद्दल मत घेतले जाते. बऱ्याचवेळा संकोचाने विद्यार्थी चांगले मत देतात. शेवटी रिपोर्ट (अर्थात चांगलाच) जातो. सर्व आलबेल दाखवले जाते. काहींचे असे मत की विद्यार्थ्यांच्या कानावर काहीतरी पडून त्यांचे ज्ञान वाढतेच की नाही. अर्थात काहीतरी कानावर पडणारच आणि ते विषयासंबंधीही. कारण विद्यार्थी बहिरे नसतात व उन्हाळी वर्गात तमाशाचे फड बोलवत नाहीत. इतका प्रचंड खर्च करून एवढी छोटीच अपेक्षा का?

वरील सर्व बाबींचा विचार करता खालील सूचना कराव्याशा वाटतात. वास्तविक ज्याला एखाद्या विषयाची गोडी आहे, जास्त शिकायची इच्छा आहे, संशोधन करण्याची ईर्षा आहे तो कोणत्याही परिस्थितीतून मार्ग काढतो. त्याला प्रलोभनाची जरूर भासत नाही. बऱ्याच शिक्षकांनी (व इतरही लोकांनी) अलीकडे आपणहून पदरमोड करून व अगणित कष्ट उपसून पीएच्. डी. किंवा एम., ए. ए. एम्. आय. ई. यासारख्या पदव्या मिळवलेल्या आपण पहातोच आहोत. तसेच जुन्या पिढीत म्युनिसिपालीटीच्या दिव्याखाली अभ्यास करून, माधुकरी मागून व किरकोळ घरकामे करून अनेक लोक पुढे आल्याची उदाहरणे आहेत आणि आजकाल १८०० रुपयाखालील वार्षिक उत्पन्न असलेल्या पालकांच्या मुलांची तसेच इतर सवलती मिळणाऱ्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती, त्यांचा निरनिराळे क्लास, व इतर गोष्टीवरील खर्च होणारा पैसा हा एक स्वतंत्र संशोधनाचा विषय होईल. पूर्वी जेंव्हा मनीऑर्डरचे फॉर्म पोस्टात मोफत मिळत त्यावेळी त्याचा वापर निष्काळजीपणे एवढेच नव्हे तर त्याचा वापर फटाके बनविण्याकडे झाला म्हणून पोस्टखात्याने फॉर्मला किंमत ठेवली व त्याचा गैरवापर थांबला. या उदाहरणावरून माझ्या मते येण्याजाण्याचा खर्च, रहाण्याचा, भोजनाचा खर्च, दैनिक भत्ता, पुस्तके वगैरे सर्वच्या सर्व खर्च उन्हाळी वर्गाने न करता निम्मा किंवा त्याहूनही जास्त भाग उन्हाळी

वर्गाने खर्च करून राहिलेला विद्यार्थ्यांकडून घ्यावा. विद्यार्थ्यांना थोडीतरी झळ बसल्याशिवाय ते जबाबदारीने वागणे कठीण आहे. शिवाय शिक्षणसंस्थांनी शिक्षकांना उन्हाळी वर्गास जाण्याचा आग्रह करू नये म्हणजे ज्यांना खरोखरीच जास्त शिकण्याची आवड आहे असेच शिक्षक वर्गासाठी येतील. काही विद्यापीठांनी प्राध्यापकांसाठी पुस्तकांची अशी योजना काढली आहे की त्यात निम्मे पैसे प्राध्यापकांनी खर्च केल्यास काही मर्यादेपर्यंत तितकेच पैसे पुस्तकांसाठी विद्यापीठ देते. य योजनेचा अनेक प्राध्यापकांनी चांगला व भरीव उपयोग करून घेतला आहे.

-दुसरी सूचना अशी की अनेक भोंगळ उन्हाळी वर्ग चालवण्यापेक्षा संपूर्ण भारतात मिळून चार किंवा पाच उन्हाळी वर्ग झाले तरी हरकत नाही पण फक्त कष्टाळू व निष्ठावान् अशाच विद्यार्थ्यांना घ्यावे व संचालकासुद्धा शिकवणारेही तसेच असावेत. विद्यार्थ्यांनी वर्गात चांगली प्रगती दाखवली तर त्यांना अवश्य पारितोषिके द्यावीत. मूळ संस्थेत त्यांना थोडी पगारवाढही द्यावी व जे टिवल्याबावल्या करतात त्यांना त्या प्रमाणात शासनही करण्याची सोय असावी. त्याचप्रमाणे संचालकांनी आपल्या खात्यातील कुठल्याही सोम्यागोम्याला सहाय्यक न नेमता त्या त्या विषयातील व उपविषयातील निष्णात लोक घ्यावेत. स्वतःच्या खात्यात असे लोक नसतील तर बाहेरून अशा विद्वानांना पाचारण करावे. वर्गासाठी अभ्यासक्रम ठरवताना कुठल्यातरी परदेशी विद्यापीठाचा अभ्यासक्रम न ठेवता जो अभ्यासक्रम नेहमी शिक्षक शिकवतात तो किंवा त्याहून थोडासा जास्त ठेवावा. या प्रकारे वर्ग चालवून जर पैसे उरले तर जास्तीत जास्त शिक्षकांना पुस्तके घेण्यास उद्युक्त करावे. त्यासाठी काही टक्के अनुदान द्यावे. इतके करूनही पैसे उरले तर निरनिराळ्या शिक्षणसंस्थांना अनुदाने द्यावीत – तेही अर्थात काही अटींवरच. म्हणजे उपलब्ध पैसा सार्थकी लागेल.

– एक चिकित्सक



शहाळं खाण्याची
ही एक पद्धत

पण ही
त्यापेक्षांही चांगली



भारतातील सर्वोत्कृष्ट नारळांच्या कुरकुरीत स्वादिष्टपणाची मधुर चव तुम्हांला ब्रिटानिया नाईस बिस्किटांत आढळेल. ही उत्तम स्वादाची नि कुरकुरीत असून त्यांवर उत्तम प्रकारची शुभ्र साखर पसरलेली असते. ब्रिटानिया नाईस. वैशिष्टयपूर्ण स्वादाची वैशिष्टयपूर्ण बिस्किटे.




ब्रिटानिया
नाईस
बिस्किटे

भारतातील सर्वोत्कृष्ट बिस्किटे ब्रिटानि

शंकर ब्रह्मे समाजविज्ञान ग्रंथालयाच्या घतीने 'भारतातील दारिद्रयाची समस्या आणि निर्मूलन' या विषयावर पुण्यात नुकतेच एक चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. या चर्चासत्रास महाविद्यालयीन विद्यार्थी, विविध राजकीय पक्षामधील तरुण नेते आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

तात्विक बैठक आणि स्वत:चे अनुभव ह्यांच्या आधारे उपस्थितांनी दारिद्रयाच्या समस्येचे विवेचन केले आणि दारिद्रय निर्मूलनाचे दृष्टीने विविध मार्ग सुचविले. तसेच ह्या कामी येणाऱ्या प्रत्यक्ष अडचणींची मनमोकळी चर्चा केली. प्रस्तुत लेख ह्या चर्चेमधील तात्विक विवेचनावर आधारलेला आहे.

# भारतातील दारिद्र्याची समस्या

## एक चर्चा

---

भारतातील दारिद्रयाच्या समस्येची व्याप्ती आणि तीव्रता आज विविध अभ्यासकांकडून मांडली जात आहे. परंतु या अभ्यासांमध्ये दारिद्र्याच्या कारण परंपरेची व्यवस्थित छाननी झालेली दिसत नाही. भारताच्या आर्थिक, राजकीय व सामाजिक इतिहासाची दखल घेऊन आजच्या दारिद्रयाच्या समस्येची चिकित्सा केल्यास त्या समस्येचे जटिल आणि मूलगामी स्वरूप अधिक सुस्पष्ट होईल आणि दारिद्रय-निर्मूलनासाठी यथायोग्य उपाययोजना शोधणे शक्य होईल.

आज भारतातील दारिद्रयाच्या संदर्भामध्ये तात्कालिक समस्यांचा, उदाहरणार्थ सुशिक्षित वर्गातील बेकारी यासारख्या प्रश्नाचा वरपांगी विचार होत आहे आणि प्रस्थापितामध्ये बदल न घडविता, आजची घटनेची व मालकी हक्कांची चौकट कायम ठेवून योजना सुचविल्या जात आहेत. भांडवलशाही समाज अर्थव्यवस्था, संसदीय लोकशाही आणि ह्यामध्ये होत असणारा व्यक्तिस्वातंत्र्याचा आभास हीच मूलभूत मूल्ये मानून दारिद्रय-निर्मूलनाचा विचार करण्याची प्रवृत्ति विशेषत:

सुशिक्षित वर्गामध्ये आढळून येते. परंतु ही मूल्ये काळजीपूर्वक तपासून पाहणे अत्यावश्यक आहे.

भांडवलशाही अर्थव्यवस्था ही व्यक्तिगत स्पर्धेवर आधारलेली, वैयक्तिक नफा हेच यशाचे अंतिम निकष मानणारी व्यवस्था आहे. अशा स्पर्धेमध्ये आहेरेंची स्वाभाविकच अविरतपणे सरशी होत राहते तर ' नाहीरें 'ची ससेहोलपट होते. ही समाजरचना अन्याय्य आहे हे उदारमतवाद्यांनाही मान्य आहे पण त्यामध्ये आमूलाग्र बदल करण्याची त्यांची तयारी नाही. याचे प्रमुख कारण म्हणजे त्यांना त्यांचे ' व्यक्तिस्वातंत्र्य ' गमावण्याची भीती वाटते. परंतु प्रचलित समाजरचनेत व्यक्तिस्वातंत्र्य कोणापुरते मर्यादित आहे आणि कोणास आपली उद्दिष्टे अनिर्बंधपणे साध्य करता येतात हे पाहिल्यास मूठभर सत्ताधारी व संपत्तीधारी लोकांना बरेचसे निर्णयस्वातंत्र्य मिळते तर बहुजन समाजास मूलभूत मानवी गरजा भागविण्याची शक्यता नाही असे लक्षात येईल.

ह्या परिस्थितीमध्ये बदल घडवून आणण्यासाठी कारखानदार, सधन शेतकरी, शासकीय अधिकारी व विविध थरातील बुद्धिजीवी लोक यांना आपली जबाबदारी ओळखण्याचे आवाहन करून किंवा करांचेद्वारे त्यांचेकडून संपत्ती घेऊन तिचा विनियोग रोजगारी वाढविण्याकडे करता येईल व त्यामुळे दारिद्र्य कमी होईल हे केवळ दिवास्वप्न आहे. बेकारी हे दारिद्र्याचे मूळभूत कारण नसून प्रचलित समाजव्यवस्थेतील शोषण स्वातंत्र्याचा तो परिपाक आहे. विविध पातळीवरील शोषण-स्वातंत्र्य हाच दारिद्र्यनिर्मूलनाच्या मार्गातील मोठा अडसर आहे. हे स्वातंत्र्य जोवर अबाधित आहे तोपर्यंत संपत्तीचे व सत्तेचे केन्द्रीकरण होत राहाणे अनिवार्य आहे. गेल्या वीस वर्षातील भारताची आर्थिक वाटचाल पाहिल्यास औद्योगिकरणाच्या वाढीबरोबर औद्योगिक क्षेत्रातील मक्तेदारी वाढत आहे हे स्पष्ट होईल. त्याबरोबरच आयात-निर्यात व्यापार व ठोक व्यापार यांच्या नाड्या काही विशिष्ट गटाचे हातात आहेत. कर्जव्यवहाराचे बाबतही तीच परिस्थिति आढळते. देशातील साधन-सामग्री व पैसा यांचे व्यवस्थापन आणि विनियोग हे विशिष्ट गटांच्या हाती एकवटलेली असल्यानंतर सबंध अर्थव्यवस्था त्यांच्याच हितासाठी राबविली जाणे ओघानेच आले. शेतीच्या विकासाबाबतही आपणांस असेच दिसते. शेतीच्या भरभराटीसाठी पाणी-पुरवठा, कर्जपुरवठा, सुधारित बी-बियाणे व खते याचे वाटप, रस्ते व बाजार यांची सोय यासारख्या विविध योजना कार्यान्वित झाल्या. परंतु या योजनांचा फायदाही सर्वात् जास्त प्रमाणात मोठ्या जमीनधारकांनाच मिळविता आला. छोटे शेतकरी व भूमिहीन यांचेजवळ उत्पादनाची साधनेच उपलब्ध नसल्याने किंवा ती अत्यल्प असल्याने विकास योजना त्यांचेपर्यंत पोहोचत नाहीत. परंतु धाडस, कर्तृत्व व दीर्घोद्योगीपणा या गुणांच्या अभावामुळे या वर्गांची प्रगती खुंटते असा प्रचार त्यांचेबाबत ग्रामीण धनिक वर्ग करीत असतात.

लोकशाही विकेंद्रीकरणाच्या प्रयोगाखाली सहकारी संस्था, पंचायत राज्य अशा संस्थांची वाढ गेल्या दहा वर्षांत झाली. परंतु यांतील प्रमुख सत्तास्थाने ग्रामीण धनिकांचे हातीच केंद्रित झालेली दिसतात. पंचायत राज्यांतील ' कल्याणकारी ' योजनांप्रमाणेच पंचवार्षिक योजनांखालील अनेक योजना चांगल्या असून त्या राबविल्या जात नाहीत म्हणून त्या यशस्वी होत नाहीत असा युक्तिवाद अनेकदा केला जातो. परंतु या तथाकथित चांगल्या योजना वर उल्लेखिलेल्या राजकीय-आर्थिक चौकटीत अंमलात आणण्याचा प्रयत्न केल्यास त्या मलिन होण्यास वेळ लागत नाही हे आतापर्यंत अनेकदा सिद्ध झाले आहे. उत्पादनाच्या साधनांचे जोपर्यंत अत्यंत विषम असे वाटप आहे, व्यक्तिगत नफा हीच केवळ कार्यक्षमतेची कसोटी आहे आणि वैयक्तिक स्पर्धा हे मूलभूत मूल्य आहे तोपर्यंत सरकारी योजनांना ' कल्याणकारी ' स्वरूप येणे शक्य नाही. उदाहरणार्थ, सरकारमार्फत उपलब्ध होणाऱ्या कर्जांचे वाटप-मग ते राष्ट्रीयीकृत बँकांमार्फत होवो वा निरनिराळ्या कर्जपुरवठा करणाऱ्या महामंडळांतर्फे होवो—ते केवळ व्यापारी निकषांवरच होणार आणि सामाजिक न्यायाच्या उद्दिष्टांना त्यात सहाजिकच गौण स्थान असणार, भांडवलशाही अर्थव्यवस्थेमध्ये व्यापारी निकषांव्यतिरिक्त अन्य काही निकष वापरून सामाजिक न्याय साधता येईल ही आशा भ्रामक आहे. संपत्तीचे अतिविषम वाटप व सामाजिक आर्थिक न्याय यामध्ये मूलतः परस्पर विरोध आहे हे लक्षात घेऊन न्याय्य समाजरचना हे जर आपले उद्दिष्ट असेल तर त्यासाठी आर्थिक जडणघडणीमध्ये कोणते मूलगामी बदल आवश्यक आहेत याचाच विचार तपशीलाने होणे अगत्याचे आहे.

आजच्या अर्थरचनेतील दोन मूलभूत समस्यांवर चर्चेमध्ये विशेष भर दिला गेला. पहिली समस्या म्हणजे जमीन धारणेची. जमिनीच्या वाटपाच्या व कमाल मर्यादेच्या योजनांना सत्ताधारी धनिक शेतकरी वर्ग साहजिकच विरोध करतात. जमिनीचे वाटप केल्यास उत्पादन घटेल असे प्रमेय मांडून जनतेचा बुद्धिभेद केला जातो. परंतु आज जर जमिनीच्या वापराचा विचार केला तर मोठे शेतकरी जमिनीचा खरोखरच यथायोग्य उपयोग करतात असे आढळते का ?

वास्तविक लहान शेतकऱ्यांचे दर एकरी उत्पादन अधिक असल्याचेच शेती व्यवस्थापनाच्या अनेक अभ्यासांमधून आढळून आलेले आहे. शेती व्यवस्थेतील सरंजामशाहीचा पगडा आणि अपुरी साधनसामग्री यामुळे लहान शेतकऱ्यांना पुरेशी मिळकत मिळत नाही. भूमिहीनांना तर कामाची शाश्वती नाही, केलेल्या कामाचा योग्य मोबदला मिळवून देण्यासाठी संरक्षण नाही व बहुतेक ठिकाणी राजकीय नेतृत्वाच्या अभावी संघटनात्मक जागृती नाही, त्यामुळे त्यांची परंपरागत पिळवणूक अव्याहत चालू आहे. जमीनधारणा, सावकारी, कर्जवाटप याबाबत मंजूर करण्यात आलेल्या कायद्यांतून शोधण्यात आलेल्या पळवाटा रोखण्याची उपाययोजना हातात

घेण्यात येत नाही; त्यामुळे हे कायदे प्रगतिशील धोरणांचा आभास निर्माण करून सत्तेचे आसन स्थिर ठेवण्याकरिता केले गेले असावेत असे वाटते. विशेष गाजावाजा झालेल्या कूळकायद्याचे उदाहरण घेतल्यास, कागदोपत्री जरी कुळास जमीन मिळाली तरी प्रत्यक्षत: ती जमीन वहिवाटण्याचो कुळांना प्राज्ञा नसते असे अनेकदा अनुभवास येते. उत्पादनाच्या साधनांशी सबंध असणाऱ्या संघटनाक्षम वर्गांची ही स्थिती. आधुनिक जीवनपद्धतीच्या किमान सोयींपासून संपूर्णतया वंचित असणाऱ्या मागासलेल्या, फिरत्या जमातींची तर याहूनही शोचनीय स्थिती आहे. शासनकर्ते, पोलीस, धनाढ्य शेतकरी यांचा प्रतिकारशून्यपणे रोष पत्करून त्यांना आपले अस्थिर जीवन खडतरपणे कंठावे लागते. या सर्व अन्यायांवर मात करण्याकरिता सत्तेच्या बालेकिल्ल्यांना जर परिणामकारक शह द्यावयाचा असेल तर जमिनीचे केंद्रीकरण विघटित करण्यावाचून गत्यंतर नाही. शेत जमिनीचे फेरवाटप करणे हे ग्रामीण अन्याशास हात घालण्यासाठी घेण्याचें पहिले पाऊल आहे, तसेच आज उत्पादनाचे वाटपाच्या किल्ल्या अडते, ठोक व्यापारी व सावकार ह्यांचे हातात असल्याने शोषणाचे अनेक मार्ग त्यांना खुले आहेत. त्यास प्रतिबंध घालण्यासाठी शेतमालाची विल्हेवाट व कर्जपुरवठा यांसाठी न्याय्य यंत्रणा उभारण हे ओघाने येणारे दुसरे पाऊल आहे.

दुसरी समस्या औद्योगीकरणाची. औद्योगीकरणास चालना मिळाल्याशिवाय शेतीच्या प्रगतीची वाटचाल सुरू होणे कठीण आहे. आधुनिक शेतीसाठी आवश्यक अशी खते, औषधे, यंत्रसामुग्री उद्योगांकडून पुरविली जातात. तसेच उद्योगधंदे निघाल्यानंतर कामाची उपलब्धता वाढून शेतीवरील भार कमी करण्याची शक्यता निर्माण होते. परतु औद्योगीकरणाची क्षेत्रे व वेग यांचे निर्णय आज मोठ्या भांडवलदारांचेच हातांत आहेत. त्यामुळे उद्योगांचे केंद्रीकरण निरंकुशपणे चालू आहे. त्याचप्रमाणे उद्योगधद्यांची निवड समाजहितवर्धनाच्या निकषावर न होता खाजगी नफ्याच्या दृष्टीने होते. उदाहरणार्थ, वाढत्या शिक्षण-प्रसाराच्या कार्यक्रमानुसार कागदाच्या कारखान्यांना अधिक उत्तेजन देणे आवश्यक असले तरी त्याकडे दुर्लक्ष करून छोटया मोटारीच्या कारखान्यांना वरचा क्रम मिळतो. कारखानदारीकरिता आवश्यक असणाऱ्या रस्ते, लोहमार्ग, वीजपुरवठा इत्यादींची आखणी-बांधणी करताना मोठे उद्योग आणि मोठी शहरे यांना अग्रक्रम दिला जातो. तसेच काही योजना रोजगारवाढीच्या योजना म्हणून आखल्या जातात आणि त्यामध्ये मजुरांना कामधंदा देऊन त्यांचेवर ‘उपकार’ केल्याचा आव आणला जातो, परंतु हे सारे ‘उपकार’ सधन वर्गांची भरभराट जनतेकडून गोळा करण्यात येणाऱ्या पैशांतून अखंडपणे होत राहावी यांकरिता असतात याची जाणीव पुष्कळांना नसते. तुटीचे अंदाजपत्रक करून रोजगाराच्या योजना आखावयाच्या आणि चढत्या किंमतींमुळे साऱ्या श्रमजीवी लोकांची हलाखी वाढवतच राहावयाची, यांत सवलत कोणाला

मिळते आणि उपकार कोणावर होतात हे समजणे कठीण आहे काय? स्वदेशीय 'लोकप्रतिनिधीं'च्या जनहितदक्षतेची ही कथा तर मग परदेशीयांच्या सहानुभूतीत आपमतलबीपणा किती असेल याचे अनुमान करण्याकरिता काटेकोर हिशेब करण्याची गरज नाही. अप्रगत देशांच्या क्षीण आर्थिक परिस्थितीचा फायदा घेऊन आपल्या देशातील प्रबळ आर्थिक गटांची बाजारपेठांवरील नियंत्रणाची व्याप्ती वाढविण्याकरिता साम्राज्यवादी देश अचूक तत्परता दाखवितात आणि याच प्रेमाच्या पोटी औदार्याचे सडे शिंपण्याचे श्रेय ते आपणांकडे घेत असतात! हे कटु अनुभव लक्षात घेऊन परकी भांडवल व तंत्रविद्या स्वीकारताना अतिशय सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ, स्वयंचलित यांत्रीकीकरण स्वीकारताना त्याची गती देशातील व्यवसायक्षम लोकांची संख्या लक्षात घेऊन नियंत्रित केली पाहिजे. थोडक्यात म्हणजे औद्योगीकरणाचे एकंदर स्वरूप समाजाच्या गरजाभिमुख करून त्यातील अग्रक्रम ठरविणे व आर्थिक सत्तेच्या प्रादेशिक व वैयक्तिक केंद्रीकरणास प्रतिबंध घालणे अगत्याचे आहे.

मुख्य समस्या व त्या सोडविण्याचे उपाय स्पष्ट झाले म्हणजे राहातो प्रश्न तो पीडित वर्गांच्या संघटनेचा. एकीकडे समाजवादाचा मंत्रघोष करून दुसरीकडे एकांगी, विस्कळीत, तुटपुंजी व बोथट योजना एकामागून एक पुढे आणणाऱ्या सत्ताधारी वर्गाचे संधीसाधू डावपेच विस्थापित करून, पीडित वर्गांनी दारिद्र्याच्या खाईतून मुक्त होण्याकरिता निकराने लढा उभारला पाहिजे. समाजसत्तावादी ध्येयप्रणाली ही संकुचित आर्थिक मागण्या मिळविण्यापुरती मर्यादित नाही. तर सामाजिक संबंध आजच्या अन्याय्य पातळीवरून उदात्त व समृद्ध पातळीवर नेण्याकरिता आर्थिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक आणि नैतिक क्षेत्रांत करावयाच्या सुबुद्ध प्रयासांची ती एक विवेकाधिष्ठित जीवननिष्ठा आहे हे सर्व लहानमोठ्या कामगार संघटनांनी जाणले पाहिजे. श्रमजीवी वर्गांच्या वेगवेगळ्या घटकांमध्ये ही जागृती निर्माण करून ती रुजविण्याच्या कामी प्रत्यक्ष येणाऱ्या अडचणी व अनुभव लक्षात घेता दारिद्र्य निर्मूलनाचा लढा सर्व स्तरांवर अविश्रांत संघर्ष करून सातत्याने चालू ठेवला तरच अर्थरचनेमध्ये आवश्यक असे परिवर्तन घडविता येईल आणि न्याय्य समाजरचनेच्या उद्दिष्टाप्रत वाटचाल करता येईल असा निष्कर्ष निघतो

सुलभा ब्रह्मे,
कार्यवाह,
शंकर ब्रह्मे, समाजविज्ञान ग्रंथालय

१७ जुलै १९७१

# कविता

## सुगंधठेवा

हृदयसंपुटी सुगंधठेवा
कशी करू पखरण
मी अजून मुग्धा कलिका
कदाचित उमलून
जर इच्छिले समर्पण
गुज मनीचे उमजेल का
कदाचित जाणून
जर घेतलेस दान
सुगंध अक्षय राहील का ?
सुगंध अक्षय राहील का ?

—मंगला आगाशे

## पिसाट वारा

पिसाट वाऱ्याच्या
सुसाट वेगाची
आस माझी
निरंतरची
अनंतापर्यंतची
ही पण आस माझी
जलाशयाच्या
संथ गंभीरतेची
डोळ्यात असावी
विजलीची चमक
धारदार तरवार
दिपवणारी
नाहीतर नंदादीप
शांत तेवावा
निसर्ग हसावा
फुलपाखरी रंगात
किंवा आसमंतात
शुभ्र पवित्रता
भरून उरावी
गरुडभरारीची
झेप आहे मनात
खिळते दृष्टी कधी
निश्चल ध्रुवापाशी
इच्छा तीच माझी
अन् कदाचित् साऱ्यांची
पण मातीच्या जगात
सारेच त्रिशंकु

—मंगला आगाशे

## घनश्याम हवा

रे ! सांग उद्धवा
कधी हरी येणार ?
ते रूप मनोहर
पुन्हा कधी दिसणार !

किति वाट पहावी !
काळ संपला फार,
हे जीवन वाटे
तयाविना निस्सार !

रे ! वेड लाविले
मंजुळ मुरलि रवाने,
तो सूर वांछिती
किति रे अधिर मनाने

जल भरण्या कारण
नकोच जाणे आज,
मन अस्थिर होई
सुचे न काही काज

तू म्हणसि, " सावळा
हरी दूर मथुरेला,
परि मानस – मंदिरि
तुमच्या सदैव वत्सला ! "

मधु बोल परिसुनी
कशी पूर्ति होणार !
जो समोर ना, तो
अम्ही कसा बघणार ?

प्रतिबिंब कशाला ?
भास न तृप्ती देई,
घनश्याम हवा, अन्
नकोच दुसरे काही

तू दाखवशिल ना
अम्हास प्रत्यक्षात ?
ज्या सदैव पुजिले
जागेपणि, स्वप्नात !

—सौ. सुलोचना घोटीकर

## आस्वाद

---


मंगला श्री. आगाशे यांच्या दुसऱ्या कवितेत एक अस्फुट भावार्थ आविष्काराच्या खटपटीत हरवला आहे. 'हृदयसंपुट', 'सुगंधठेवा' यासारख्या बोजड सामाजिक शब्दांचे गाठोडे डोक्यावर घेऊन कविता चालू लागते. तिची वाट मऊ गवताची आहे. पण ती फार अस्पष्ट आहे. शब्दांच्या पालापाचोळ्यात झाकोळलेली आहे. उमलू पाहणाऱ्या या कलिकेचे साशंक सुगंधदान कवितेत स्पष्टपणाने उमटूच

शकलेले नाही. शेवटच्या ओळीच्या द्विरुक्तीने नाजुकसा तरंग मात्र निर्माण झालेला आहे.

मंगला श्री. आगाशे यांच्या पहिल्या कवितेची सुरुवात पिसाट वाऱ्याच्या सुसाट वेगाने झालेली आहे. कवयित्रीच्या मनातल्या परस्परविरोधी, पण तीव्र अशा काही आकांक्षा इथे एकत्र आलेल्या आहेत. पिसाट वाऱ्याच्या सुसाट वेगाबरोबर शांत जलाशयाच्या संथ गंभीरतेची आस कवयित्रीच्या मनात साठलेली आहे. विजलीची चमक आणि धारदार तरवार यांच्या जोडीने शांत तेवणारा नंदादीप तिला हवा आहे. कवितेच्या पूर्वार्धात असलेली ही विरोधी प्रतिभांची गुंफण उत्तरार्धात विसकटली आहे, आणि कवितेला सरळ निवेदनात्मकता प्राप्त झाली आहे. निसर्गाचे फुलपाखरी रंग, आसमंतातली शुभ्र पवित्रता, गरुडभरारीची झेप आणि निश्चल ध्रुवावर खिळलेली दृष्टी यांचा घाटदार आकृतिबंध त्यामुळे तयार होत नाही. पण शेवटच्या तीन ओळींनी कवितेला विश्वात्मकता लाभल्यासारखे दाखवून साऱ्या कल्पनांना, प्रतिमांना ठासून एकत्र सांधले आहे. ' मातीच्या जगात सारेच त्रिशंकु ! ' ही कल्पना फार बोलकी आहे. अर्थवाही आहे.

" घनश्याम हवा ! " ही सौ. सुलोचना घोटीकर यांची कविता म्हणजे गोपींच्या विरहभावनेचे साधेसरळ गेय प्रगटीकर आहे. त्यातले सौंदर्य हे आविष्काराच्या साधेपणाचेच सौंदर्य आहे. उद्धवाशी गोपींनी केलेले हे संभाषण त्यांच्या मनातली भावना कुठल्याही काव्यात्मतेशिवाय सरळपणे व्यक्त करते. अधीर मनाने मुरलीच्या मंजुळ सुरांची अभिलाषा करणे आणि अस्थिर मनाला काही काम सुचेनासे झाल्याने " जळ भरण्याकारण नकोच जाणे आज " असे वाटत राहणे या दोन्ही अवस्था भावरम्य आहेत. त्यातील सौहार्द विभोभनीय आहे. उद्धवाच्या तत्त्वज्ञानाने, कोरड्या सांत्वनाने या गोपींचे समाधान होतच नाही. त्यांना हवी आहे रोखठोक प्रतीती. प्रतिबिंब नको, प्रत्यक्ष हवे. तो घनश्याम त्यांना हवा आहे. त्याचा नुसता भास नको. कारण त्याला त्यांनी सदैव स्वप्नीजागेपणी पूजिले आहे या कवितेतली गोपींची मनःस्थिती आग्रही असली, तरी सरळभाबडी आहे. संयत आहे.

—रसिक



# रिव्हालिनोचे काय झाले ?

मानवाला न उकलणारे गूढ...

सुधाकर घारपुरे

आपल्याला ज्ञात असलेल्या मानवीसृष्टीव्यक्तिरिक्त आणखी एखादी मानवसृष्टी किंवा मानवसदृश सृष्टी अस्तित्वात आहे का हे एक न उकलणारे गूढ आहे. चंद्रावर कसल्याच प्रकारची जीवसृष्टी अस्तित्वात नाही हे शास्त्रज्ञांना ठाऊक होते. आणि आता प्रत्यक्ष मानवच चंद्रावर जाऊन पोहोचल्याने शास्त्रज्ञानी काढलेल्या अनुमानाला बळकटीच आली आहे. पण मंगळावर मात्र जीवसृष्टी असावी तीही प्रगत अवस्थेत असावी असा शास्त्रज्ञांचा कयास आहे. आपल्या पुराणातही स्वर्ग आणि पृथ्वी यांच्यामधल्या स्तरावर जीवसृष्टी होती अशा प्रकारची वर्णने आहेत. गंधर्व, किन्नर वगैरे लोक या स्वर्गलोकापेक्षा खाली पण भूलोकापेक्षा उंच अशा या लोकात रहात असत. कधी कधी त्यांचा संचार पृथ्वीवर होई. त्यांच्या अंगी अनेक अतिमानुषी शक्ति असत अशी वर्णने पुराणात सापडतात. प्रत्यक्ष शेक्सपियरही लिहून जातो की आपल्या कल्पनेपेक्षाही अद्भुत अशा कितीतरी गोष्टी या विश्वात आहेत. शेक्सपियरची ही शक्ती केवळ काव्यविलास म्हणून सोडून दिली तरी काही वेळा असे चमत्कार घडतात की त्यांचा उलगडा विज्ञानावर प्रभुत्व मिळविलेल्या मानवी बुद्धीलाही होत नाही. काही गोष्टी तर्कापलीकडे घडतात. एखाद्या गोष्टीचा उलगडा झाला नाही की आपण त्याची चमत्कारात

गणना करतो. या गोष्टी कायमच्या रहस्यमय होऊन बसतात. त्यांच्याभोवती एक चमत्काराचे वलय निर्माण होते पण मानवाची जिज्ञासा मात्र अपूर्णच रहाते. या विश्वात अतिमानवी प्राण्यांचा संचार आहे का हा असल्याच प्रकारचा प्रश्न आहे.

पृथ्वीबाहेरील विश्वात कोठेतरी अतिमानुषी शक्तीचे अस्तित्व आहे या कल्पनेला काही बुद्धीवादी लोक हसतात त्याची टवाळी करतात. हा भोळ्या लोकांच्या कल्पनेचा खेळ आहे असे म्हणतात. पण काही गोष्टींचा उलगडा त्यांनाही होऊ शकत नाही. एखाद्या घटनेचे कारण त्यांनाही सापडत नाही.

मागे काही वर्षापूर्वी कलकत्त्यात उडत्या तबकड्यांनी खूप खळबळ माजविली होती. वृत्तपत्रांच्या चौकटीत ती वृत्ते प्रसिद्ध होत होती. त्या तबकड्यांचा अर्ध-वर्तुळाकार प्रकाशमान दिसत असे. आकाशात सर्व जागी त्या संचार करीत. काही लोकांना वाटले की चाचणीकरता उडविण्यात येणारे फुगे असावेत ते ! पण वेध-शाळेने ते "फुगे" नव्हते असे जाहीर केले. मग ते काय होते ? त्या खरोखरच उडत्या तबकड्या होत्या काय ? का लोकांच्या कल्पनेचा तोही एक खेळच होता ? कोणी काहीही म्हणो त्या तबकड्यांचे योग्य स्पष्टीकरण अजून कोणीही देऊ शकला नाही.

अशीच एक गूढ घटना ब्राझिलमध्ये काही वर्षापूर्वी घडली ! त्या घटनेचे स्पष्टी-करण अजूनही कोणाला देता आलेले नाहीं.

१९ ऑगस्ट १९६२ हा दिवस ! ब्राझिलमधले एक छोटेसे गाव ! त्या दिवशी दिवसभर दमूनभागून रिव्हालिनो आणि त्याचीं कुटुंबीय मंडळी शांतपणे आपल्या घरात झोपली होती. कुटुंबीय म्हणजे तरी कोण तर रिव्हालीनो आणि त्याची तीन मुले ! एक वर्षापूर्वीच रिव्हालीनोची बायको मरण पावली होती आणि आपल्या तीन कच्च्याबच्च्यांना घेऊन रिव्हालीनो रहात होता. आपल्या तीनही मुलांचे पालनपोषण करीत होता. मुलांची आई नसल्याने आईसारखीच माया त्या मुलांवर करीत होता. त्याचा सगळ्यात मोठा मुलगा रैमुंदो हा जेमतेम १२ वर्षांचा होता.

त्या रात्रीच्या प्रहरी ते चौघे शांत झोपले होते. इतक्यात कसल्यातरी चाहुलीने रिव्हालिनोला जाग आली. घरातून कोणीतरी पळत असल्याचा भास त्याला झाला. तो ताडकन् उठला. त्याने मेणबत्ती पेटविली आणि सभोवार दृष्टी टाकली. – काय दिसले त्याला ?

त्याला एक विलक्षण दृश्य दिसले !

काही विचित्र आकृत्या – ज्या मनुष्यकृतिही नव्हत्या किंवा प्राण्यांच्याही म्हणता आल्या नसत्या – अशा आकृत्या खोलीत फिरत असल्याची जाणीव त्याला झाली. त्या आकृत्या कशाचातरी शोध घेत होत्या. कोणाल तरी शोधत होत्या. त्या मुलाच्या जवळ गेल्या...काही क्षणच ! आता मात्र रिव्हालिनोच्या अंतःकरणाचा थरकाप उडाला ! पण लगेच त्या रिव्हालिनो ज्या अंथरुणावर झोपला होता तेथे आल्या.

आपल्यावर काहीतरी प्राणघातक संकट कोसळणार हे त्याला जणू कळून चुकले. त्याने चटकन गुडघे टकले..परमेश्वराची करुणा भाकायला सुरुवात केली कारण त्या सावल्यासारख्या दिसणाऱ्या आकृत्या त्याचाच शोध घेत आहेत हे त्याला समजून चुकले !

हा त्याच्यावरचा दुसरा प्रसंग होता !

रिव्हालिनोला आठवले.. दोनच दिवसापूर्वी त्याच्या घरीच एक विचित्र प्रसंग घडला होता !

दोन दिवसापूर्वी जेव्हा रिव्हालीनो संध्याकाळी कामावरून घरी परत आला होता तेव्हा त्याला दोन 'अदभूत प्राणी " त्याच्या अंगणात दिसले. त्यांची उंची केवळ तीन फट असेल नसेल !

ते विचित्र प्राणी त्याच्या घराजवळ काहीतरी खणत होते. तो आल्याबरोबर त्यांनी धूम ठोकली आणि ते जवळच्या झुडपात लपले. रिव्हालीनो पहातच राहिला ! एकच मिनिटानंतर त्या झुडुपातून काही विचित्र दिसणारी वस्तू झपाट्याने वेगाने उडून वर गेलेली त्याला दिसली. एखाद्या हॅटला तांबडी झगमगणारी किनार असावी तशी ती वस्तू त्याला दिसली होती.

दुसऱ्या दिवशी त्याने आपल्या दोन मित्रांना ही हकीगत सांगितली होती पण त्यांनी हेटाळणी करून त्याची टवाळी उडविली होती.

आणि आताही दोन दिवसानंतर तोच प्रसंग !

त्याने भितीनें मुलाला उठविले आणि घडलेला प्रकार सांगितला. सुदैवाने त्यावेळी काहीही घडले नाही.

सकाळी त्याचा मुलगा रैमुंदो हा पहिल्यांदा काही कामासाठी घराबाहेर आला आणि त्याला एक विचित्र दृष्य दिसले ! जमिनीपासून काही फूट अंतरावर भाल्यासारख्या दिसणाऱ्या दोन मोठ्या विचित्र आकृती हवेत तरंगत होत्या. मागे पुढे करीत होत्या. आणि मशिनमधून येणाऱ्या आवाजासारखा घरघर आवाज त्यामधून येत होता. तो त्याला ऐकू आला. त्यामधून मधूनमधून ज्वालाही बाहेर पडत होत्या.

त्याने चटकन आपल्या बापाला बाहेर बोलावले !

रिव्हालिनो बाहेर आला.

आणि...

आणि तावडतोब त्या दोन भालाकार आकृती रिव्हालिनोजवळ एकत्र झाल्या ! पिवळसर धूर आसमंतात पसरला ! त्याने रिव्हालिनो पार झाकून गेला ! थोड्याच वेळात धूर नाहीसा झाला तेव्हा रैमुंदोला वेड लागण्याची पाळी आली !

कारण परिकथेतल्या अदभूत गोष्टीप्रमाणे रिव्हालिनो तेथून नाहीसा झाला होता. त्याचा मागमूसही उरला नव्हता ! त्या विचित्र वस्तूही नाहीशा झाल्या होत्या !

रैमुंदो तडक धावत धावत पोलीस चौकीवर पळाला. चौकीवर लेफ्टनंट लिसोबा हा ड्युटीवर होता. पहिल्यांदा त्याचा रैमुंदोच्या म्हणण्यावर विश्वासच बसला नाही ! ही एक थाप आहे असेच त्याला वाटले. इतकेच नव्हे तर प्रत्यक्ष रैमुंदोनेच आपल्या बापाचा खून केला असावा व वेड पांघरून तो पेडगावला जात असावा अशीही त्याला शंका आली. त्याने रैमुंदोला अनेक प्रश्न विचारले पण रैमुंदोच्या हकीगतीत त्याला कोठेही 'फट' आढळली नाही. अनेक उलटसुलट प्रश्नांना रैमुंदोने सरळ आणि स्वच्छ उत्तरे दिली. त्याने ह्या जागेची कसोशीने तपासणी केली पण रिव्हालिनोचा मागमूसही त्याला लागला नाही. इतकेच नव्हे तर – खून झाला असता तर प्रेत नक्कीच मिळाले असते – पण रिव्हालिनोचे प्रेतच काय पण त्याचे नखही कोणाच्या दृष्टीस नंतर पडले नाही. शिवाय रैमुंदोसारखा १२ वर्षाचा मुलगा रिव्हालिनोसारख्या धडधाकट माणसाचा खून करू शकेल ही कल्पनाच अशक्य वाटणारी होती.

मग रिव्हालिनोचे काय झाले !

मीठ पाण्यात विरघळावे तसा जणू रिव्हालिनो हवेत विरघळला होता !

शेवटी रैमुंदोच्या हकीगतीवर विश्वास ठेवणेच भाग होते. रिव्हालिनोच्या मित्रमंडळीनीही रिव्हालिनोने आपल्याजवळ या विचित्र घटनेचा उल्लेख दोन दिवसापूर्वी केल्याचे सांगितले.

रिओ – द जानीरोच्या 'कारिओ, डा आहा' या पत्रात या घटनेची हकीगत तिखटमीठ लावून प्रसिद्ध झाली. त्यावर उलटसुलट चर्चा झाल्या आणि आजूबाजूच्या वातावरणात घबराट पसरली जशी आपल्याकडे 'रामन् राघव'च्या वेळी पसरली होती.

रिव्हालिनो नाहीसा झाला तो झालाच !

त्याचा कधीच पत्ता लागला नाही !

काय झाले त्याचे !

काय झाले ते एक त्याचे त्याला आणि परमेश्वरालाच ठावूक !

[ आधारीत ]

सु. म. घाटे

# पुस्तके

## समिधा

### जीवनाला सरळ सामोरी जाणारी व्यक्तिरेखा

एखाद्या लेखकाने त्याच्या आधीच्या वाङ्मयापेक्षा वेगळी व वरच्या दर्जाची कलाकृती रसिकांना दिली तर त्यांच्या अपेक्षा अर्थातच वाढतात व त्यानंतरच्या त्याच्या प्रत्येक कृतीचे मूल्यमापन त्याच्या त्या वेगळ्या कृतीशी तुलना करून होते. श्री. ज. जोशींनी जेव्हा 'आनंदी-गोपाळ' लिहिली तेव्हा त्यांच्याविषयी अशाच अपेक्षा आढल्या. नंतरच्या 'चार्वाक'ने त्या उंचावलेल्या अपेक्षा अधिक वर नेल्या नसल्या तरी 'आनंदी-गोपाळ' इतकेच मोठेपण 'चार्वाक'लाही आहे. त्यामुळे पुढची जोशींची कादंबरी कुठली असणार अशी उत्कंठा प्रत्येकालाच होती. 'समिधा' अपेक्षाभंग मुळीच करीत नाही.

'समिधा' ही नायिका प्रधान कादंबरी आहे. म्हणजे तसा नायक कादंबरीला आहे. त्याचे नाव आत्माराम, हा एका श्रीमान् घराण्यात जन्माला आला आहे. त्याचे भाऊ श्रीमंत आहेत. शिकलेले आहेत. त्यांच्या बायका गोऱ्या-गोमट्या व सधन बापांच्या आहेत. सगळे घराणे आसपासच्या भागात मोठे समजले जाते. आत्माराम मात्र बंगल्यातल्या इतर माणसांपेक्षा थोडा वेगळा आहे. तो वृत्तीने कवी आहे. क्रांतिकारी विचार त्यांच्या मनात आहेत. शिरपूरच्या भाऊसाहेब चौधरींनी शेती लोकांना वाटून टाकावी यासाठी त्याच्या हृदयपरिवर्तनाची तो वाट पाहतो आहे. श्रीमंत, सुंदर मलीशी लग्न करायला तो तयार नाही. ते एक तत्त्व म्हणून. म्हणून एका मास्तरांच्या कुरूप मुलीशी—समिधेशी—तो लग्न करून स्वतःच्या सर्व माणसांचा राग त्याने ओढवून घेतला आहे. बंगल्याच्याच आवारात तो एका झोपडीत राहतो. क्रांतीची स्वप्ने बघतो. त्याला कोणाचेच दुःख, त्रास पाहवत नाही समिधेवर त्याचे प्रेम आहे. ती कुरूप असली तरी अंतःकरणाने स्वच्छ, समंजस, प्रौढ आहे. बंगल्यातील माणसे व ही दोघे ह्यांच्यात बरेच अंतर पडले आहे. समिधेला तर बंगला आपला प्रतिस्पर्धीच वाटतो आहे. त्याच्यावर कोणत्या ना कोणत्या

तऱ्हेने मात करण्याची त्याला शरण आणण्याची ईर्ष्या तिच्या मनात आहे.

भाऊसाहेब चौधऱ्यांच्या वाईटावर असलेली काही माणसे त्यांचा खून घडवून आणतात व मोठ्या चतुराईने त्यांचे 'हृदय' परिवर्तन करू पाहणाऱ्या आत्मारामवर खुनाचा आळ येईल अशी व्यवस्था करतात. आत्माराम कोर्टात काहीही न बोलता जन्मठेपेवर जातो. सत्याची हिंसा त्याच्या मनाला सहनच होत नाही. आपल्या बचावाचा तो जरासुद्धा प्रयत्न करीत नाही. त्याच्या मनातून ह्या सर्व गोष्टींबद्दल, व्यक्तींबद्दल एकप्रकारचा कडवा अनादर निर्माण होत जातो.

जन्मठेपेच्या काळात समिधेची मोठी केवीलवाणी स्थिती होते. स्मशानातसुद्धा तिला आसरा घ्यावा लागतो. 'पुरुष' नसलेल्या एका पुरुषाची पत्नी वारल्यानंतर तिच्याकडे तो भलतीच मागणी करतो. एक मुख्याध्यापक तिला 'तू नवऱ्याचे नाव टाकून, वडिलांचे नाव लाव. तर नोकरी देतो' असे सांगतो. त्यावेळी करारी समिधने त्याला तसेच परखड उत्तर दिलेले असते.

मधून मधून ती नवऱ्याला भेटूनही येते. दोन मुलगे मोठे होत असतातच.

त्यानच तिला श्रीकांत–तिचा दीर–मदतीचा हात देतो. तशी ह्यापूर्वी त्याने मस्त देऊ केली आहे पण तिने नाकारली आहे. श्रीकांत व आत्माराम यांच्यात बरेचमे साम्य आहे त्याने दिलेल्या कर्जातून ती एक इंजिनिअरिंग फर्म काढते. मुलेही त्यात काम करतात. पैसा चांगला मिळू लागतो.

जन्मठेप पूर्ण होऊन आत्माराम परत येतो व नव्या घरी राहू लागतो तेव्हा तो सहज म्हणतो 'तू देखणी नव्हतीस म्हणूनच मी निश्चित मनाने तुरुंगात होतो.' हे वाक्य खास विचार करण्यासारखे होते–तिच्या दृष्टीने ! त्याचवेळी ती सांगते की श्रीकांत बरोबर आपला एक दोन वेळा शारीरिक–संबंध आला होता. त्याचे ती स्पष्टीकरणही देते; 'त्यांना चांगली, देखणी पत्नी असून माझी भुरळ पडली व मला वाटलं श्रीकांतच्या रूपानं तो आढ्यताखोर बगलाच माझ्या पायांशी नम्र झाला'

त्याला हे सहन होत नाही. तिला तो हे सगळं खाजगी पत्रात लिहितो तिच्या श्रीकांत बरोबरच्या संबंधाची हकीकत त्याच्या उरात जहरी बाणासारखी घुसते. व तो आत्महत्या करण्याचा निर्णय घेतो व 'गावात आणि सगळीकडे पसरलेल्या भ्रष्टाचार, अनीती, लाचलुचपत याविरुद्ध निषेध' असे कारण देऊन आत्महत्या करतो.

ही कथा विशेषतः समिधेचीच आहे. ती धाडसी आहे. करारी आहे. आपल्या काव्यवेड्या व क्रांतिप्रिय पतीला ती जिवापाड सांभाळते. त्याच्या तुरुंगवासात मुलांना स्वतःच्या पायावर उभे राहायला शिकविते.

त्या मुळेचे शेवटचे प्रकरण जोशींनी फार सुंदर रंगविल्याची खात्री पटते तुरुंगा-

तून सुटून आल्यानंतर तो विलक्षण एकटा पडतो. मुलेही दूरच असतात. समिधेच्या मनात तो कधी सुटून परत येईल हे आलेलेच नसते., त्यामुळे त्याच्या आगमनानंतर अधिकच तणाव त्या कुटुंबात निर्माण होतात. त्यातच ती श्रीकांतसंबंधी सांगते. जग होते तसेच आहे. प्रत्यक्ष पत्नीने फसविले आहे हे त्याच्या लक्षात येते व त्याला आत्महत्येशिवाय गत्यंतरच राहत नाही.

समिधेविषयी वाचकाच्या मनात–तिने नवऱ्याशी प्रतारणा करूनही–तिरस्कार निर्माण होतो काय ? मुळीच नाही हे तर खास वैशिष्ट्य आहे या कादबरीचं ! समिधेसारखी ताठ मानेने जगणारी, कुरूप असली तरी तरुण स्त्री... तिलाही काही भावना असणार. विकार असणार. व त्यातही ती ग्वाही देतच होती आपल्या पतीला : ' केवळ शरीरधर्म म्हणूनच. माझं मन भ्रष्ट झालं नाही.' म्हणूनच त्याच्या आत्महत्येचं कारण समिधा नव्हे ! तिचं वागणं नव्हे ! श्रीकांतबरोबरचे तिचे संबंध नव्हे ! मग ?

त्याच्या आत्महत्येचं एकमेव कारण म्हणजे त्याचा स्वभाव, त्याचं असं मरण हे केवळ अटळ आहे. अपरिहार्य आहे. त्याचा शोकान्त हा त्याच्या स्वभावातूनच निर्माण झाला आहे.

त्याचा स्वभाव ध्येयवादी आहे. तो कवी आहे. क्रांतिप्रिय आहे. थोडासा कम्युनिझमकडे कल असलेला आहे. व्यवहार व तडजोड त्याच्या रक्तातच नाही. चौधरींचा खून हा त्याने फक्त पाहिलेला आहे. त्याचा त्यात मुळीच हात नाही. पण बनावट साक्षीदार ' खोटं ' बोलतात हेच त्याला पटत नाही. खपत नाही. लोक असत्य बोलू शकतात हेच त्याच्या विचारसरणीला पटत नाही. त्याच्या कविहृदयाची सरळ साधी इच्छा अशी की, भाऊसाहेब चौधरींना इतक्या जमिनीची आवश्यकता नाही. ती त्यांनी वाटून द्यावी. भोळा, अव्यवहारी, निष्कपट, सत्यप्रिय, सरळमार्गी, संवेदनाक्षम अशा आत्मारामासाठी कठोर, निर्दय, कपटी, बिलंदर भाऊसाहेब चौधरींचे हृदय बदलणार कसे ? पण हा विवेक त्याला नाही. अशा व्यक्तीच्या ध्येयांचा शेवट शोक हाच आहे. तसा दुनियेचा रिवाज आहे.

कादबरीत इतरही पात्रे आहेत. आत्मारामाचे वडील हे एक अव्वल पात्र आहे. श्रीमत व श्रीमंतीने येणारे सर्व दुर्गुण त्यांच्यात आहेत. समिधा गरीब व कुरूप म्हणून तिची शक्य तेवढी टिंगल ते करतातच. पण मुलावर खुनाचा आरोप आल्यानंतर ' तो आपला कोणीही नव्हे ' इतके म्हणण्याइतका निर्लज्जपणा त्यांच्या पैशाने त्यांना दिलेला आहे.

समिधेचे वडील मास्तर आहेत व लाचार, गरीब मास्तर जसे वागतात तसेच तेही वागले आहेत.

भाऊसाहेब चौधरींचा मुलगा ही राजकारणातली एक खास वल्ली आहे. हा महाधोरणी आहे. आत्माराम सुटणार असे कळल्यावर स्वतः तो तुरुंगापर्यंत जाऊन

त्याचे स्वागत करतो व आपल्या ' खुल्या ' दिलाची साक्ष सचित्र प्रकाशित करतो.

श्रीकांत ह्या समिधेचा दीर. आत्मारामसारखाच तो दिसतो. तिच्या राठ, पोलादी सौंदर्यावर तो कर्तबगार पुरुष मोहित झाला आहे.


समिधेचा व श्रीकांतचा प्रणय लेखकाने इतका संयमाने व सूचकतेने रंगविला आहे की पुढे तिनेच सांगितल्यानंतर या पूर्व-वर्णित घटनेचा अर्थ लागतो.

या कादबऱ्यांचा एक धोका श्री. जं. नी सफाईदारपणे टाळला आहे. बव्हंशी ह्या कादंबऱ्यांत ज्या ध्येयवादी व्यक्ती असतात त्यांना वेळी अवेळी (अवेळीच) भाषणे झोडण्याची अनिवार इच्छा होते व लेखक त्यांना आपल्या कादंबरीचे व्यासपीठ मोकळे करून देतो. थोरामोठ्यांच्या हातून हे झालंय्! वि. स. खांडेकर, ग. त्र्यं. माडखोलकर व राजकारण तोंडी लावून तंत्राचा वापर करणारे आप्पासाहेब फडकेही याला अपवाद नाहीत. नायिकेसमोर गांधीवादाचा फोलपणा, मध्यप्रदेशातील राजकारण, नेताजींची योग्यता, युद्धोत्तर परिणाम इ. इ. विषयांवर आडमाप व्याख्याने झोडण्यात माडखोलकरांचे हिरो पटाईत आहेत. श्री. जं. नी हे सगळं टाळलं आहे. त्यांनी कथा व त्यातील अनुषंगाने येणारे राजकीय विचार यांचा असा सुंदर समतोल साधला आहे (जसा तो ' चार्वाक 'मध्येही होता.) की त्याला तोड नाही.

संपूर्ण कथेचा आपल्यावर परिणाम विषण्ण करून टाकणारा आहे. अर्थशून्य, निरर्थक जीवनाला आपल्या अवघ्या शक्तींनिशी सामोऱ्या जाणाऱ्या समिधेविषयी आपल्या मनात एक सहानुभूती निर्माण होते कायम राहते.

एवढे यश हेच कादंबरीचे मोठेपण नव्हे काय ?

' समिधा ' : श्री. ज. जोशी : केसरी प्रकाशन, पुणे : मूल्य ७ रुपये.



१० जुलैच्या अंकात जागेअभावी प्रसिद्ध न झालेला
Extrasensary Perception या पुस्तकातील भाग

ज्ञात-अज्ञाताच्या सीमारेषेवर

# दैवी देणगी

## या पलिकडे उत्तर आहे का?

' दृष्टी, स्पर्श व श्रवण आदि पंचेंद्रियांच्या साह्याने भोवतालच्या वातावरणाची माहिती आपणाला मिळत असते. पण नेहमीच असे होते का? काही वेळा या साऱ्या संवेदना शक्तिच्या साह्याने न उलगडता येणारे अनुभव आपल्याला येतात. कोठेतरी दूरच्या ठिकाणावर घडत असणारी गोष्ट आपणास अगदी स्पष्टपणे जाणवते. एखाद्या जवळच्या माणसाच्या, शरीराने शेकडो मैल अंतरावर असताना मनात आलेले विचार लगेच कळतात. भविष्यकाळात घडणाऱ्या एखाद्या घटनेचा धगधगीत प्रकाशही एखाद्याला दिसू शकतो.

शास्त्रीय दृष्टिवून विचार केला तर यातली तीन तत्वे दिसतील. पहिली म्हणजे स्थल कालातील ज्या दूरवरच्या घटनेचा तुम्हाला बोध होतो त्या गोष्टी कळण्याची तुमची आत्यंतिक तीव्र इच्छा तुमच्या अबोध मनात तरी निश्चितच असते. दुसरे असे की मनावरचे सगळे ताण सैल होऊन मनाला ज्यावेळी मोकळे मोकळे आणि हलके हलके वाटते त्या वेळी हे ज्ञान अधिक सहजपणे होते. तिसरी ही गोष्ट लक्षात ठेवायला हवी की त्यावेळी काही प्रमाणात माणसाच्या मनाची अतिशय संवेदनशील भाग आणि संयपणे अलिप्ततेने घटनेकडे बघणारे मन अशी विभागणी झालेली असते. काही माणसांना दैवी देणगी म्हणूनच अशी शक्ती मिळते हेही खरे आहे.

हेलेन स्टॉल या ख्यातनाम मानसोपचाराचे उदाहरण मोठे बोलके आहे. एका मेजवानीच्या वेळी सहज डोळे मिटले असताना अमेरिकेतील एक वृद्ध नामवंत सिनेटचा सभासद अचानकपणे अमेरिकेबाहेर सार्वजनिक जागी निधन झालेला

त्याना आढळला. पार्टीला आलेल्या अमेरिकन लोकांनी व्यक्ती नेमकी कोणती याबाबत तर्क करायला त्याने सांगितले. अनेक नावानंतर स्टीव्हन्सन ह्याच व्यक्तीची ती आकृति होती. येवढे ठामपणे स्टॉलने सांगितले. सुमारे सहा आठवड्यानंतर स्टीव्हन्सन यांचे इंग्लंडमध्ये (अमेरिकेबाहेर) लंडनच्या रस्त्यावर (सार्वजनिक जागा) हृदयविकाराने (अचानकपणे) निधन झाले. त्यावेळी सगळ्यांना या प्रसंगाची तीव्रतेने आठवण झाली.

शरीरातल्या एखाद्या इंद्रियाच्या विकासाने साध्य होणारी ही शक्ती नाही. याचा उगम माणसाच्या मनामध्ये असतो. शास्त्रीय दृष्टया मनाची व्याख्या ठरवणे तसे कठीणच. पण दोन गोष्टी स्पष्टपणे समजावून घ्यायला हव्यात. एक म्हणजे मेंदू म्हणजे मन नव्हे. मेंदू हे प्रत्यक्ष दिसणारे आणि पंचेंद्रियाचे नियंत्रन करणारे इंद्रिय आहे. तर मन हे शरीरामध्ये वस्तु अर्थाने कधीच नसते. आणि शरीरातील कोणतीच जागा वा पोकळी ते भरून काढत नाही. विचार, भावना, इच्छाशक्ती या साऱ्यांचा उगम मनामध्ये होतो हे सर्वमान्य आहेच.

या साऱ्याच्या संशोधनाची सुरवात १८८० साली इंग्लंडमध्ये झाली. उस्फूर्तपणे निर्माण होणाऱ्या आणि कार्यकारण भावाचा उलगडा ज्ञात विज्ञानाच्या साहयाने न होणाऱ्या मानसिक घडामोडीच्या अभ्यासाची ती सुरवात होती. काही वर्षानंतर अमेरिकेमध्येही अशी संस्था अस्तित्वात आली. आता जगातल्या अनेक देशात तिचे जाळे विणलेले आहे.

दूरवर असणाऱ्या आपल्या प्रियव्यक्तीला आपल्या भावना, वेदना कळवणे हे टेलिपथीमुळे शक्य होते. प्रयत्नानी ही गोष्ट साध्य करून घेता येते. परंतु सर्व-सामान्य माणूसही काही वेळा ही गोष्ट अनुभवतो. असे काही क्षण असतात की आपल्याजवळची माणसे आपल्याला भेटावीत बोलावीत अशी आत्यंतिक उत्कट इच्छा मनाला होते. आलेला अवघड क्षणही असा असतो की भेट आता चुकली तर पुन्हा होईल का नाही कुणी सांगावे. यावेळी सर्वांत मूलभूत आणि वेगवान असा मानसिक संपर्काचा मार्ग मन शोधते. त्यात यशस्वीही होते. शारीरिक क्रियामध्ये गुंतलेले मन ज्यावेळी मोकळे असते. (उदा. झोप) अशावेळी हो मना-मनाची जवळीक साधण्याची शक्यता अधिक असते.

मनाशा संपर्क साधता आला नाही तरी आपल्या प्रियजनांच्यावर येत असलेल्या आपत्तीची जाणीव काही वेळा मनाला स्पष्टपणे जाणवून जाते. एक उदाहरण मोठे बोलके आहे. आपल्या मुलीला पत्र लिहित बसलेली आई. पत्र संपता सपता हात भाजल्याचा वेदना तिला होऊ लागल्या. शेवटी तर झाळ इतकी वाढली की हातातले पेन बिचारीला खाली टाकावे लागले. मुलीच्या वडिलांनाही या घटनेचे मोठे आश्चर्य वाटले. त्यानी त्याची थोडी थट्टाही उडविली. दोनच तासानंतर परगावच्या कॉलेजात असलेल्या मुलीच्याबद्दल फोन आला. प्रयोग शाळेत काम करताना दोन

तासापूर्वी मुलीचा उजवा हात भाजला आहे. ताबडतोब या. ज्ञात वैज्ञानिक विश्वाच्या आधारे याचा कार्यकारण भाव कसा दाखवणार ?

भावनेची जवळीक किंवा अतिशय आपुलकीचे संबंध नसतानाही ही क्लेरोव्हायन्स (Clairroyance)ची शक्ती काम करते. रोग्यांना धंदेवाईक पद्धतीने रक्त देणाऱ्या लंडनमधील माणसाने एका विलक्षण अनुभवाची प्रचिति दिली. तीन वर्षांत एकूण चोवीस वेळा त्याने रक्त दिले आणि त्यापैकी सातवेळा रक्त दिल्यानंतर काही वेळाने (प्रत्येक वेळा हा मधला तासांचा कालखंड निरनिराळा) त्याला अतिशय थकल्यासारखे, दमल्यासारखे आणि आजारी पडल्यासारखे वाटले. ज्यावेळी त्याला असे वाटत होते त्याचवेळी त्याने ज्याला रक्तदान केले तो माणूस मृत्यूमुखी पडलेला असे. त्याने रक्त दिलेल्या चोवीस पैकी सात माणसे दगावली. त्या सातही वेळा हा अनुभव त्याला आला. बरे हे नाटक म्हणावे तर स्वतःला हा त्रास चालू होईपर्यंत त्याला रोग्याची तब्येत कशी आहे हे कळण्याचा काहीही मार्ग उपलब्ध नव्हता.

अज्ञानात घडलेल्या घटना जाणून घेण्याची काही जणांची शक्ती अद्भूत असते. व्यक्तिशी संबंधित असलेली एखादी गोष्ट ह्या लोकांना दिली तर ही शक्ती अधिकच चांगल्या प्रकारे काम करते. हॉलंडमधला जिरार्ड क्रॉइस्ट हा असा एक समर्थ पुरुष. हरवलेल्या मुलांचा नेमका ठावठिकाणा लावून देण्यासाठी त्याची ख्याती होती. न्यूयॉर्कच्या एका विवक्षित भागात फिरताना चार वर्षाची छोटी मुलगी एकदा अचानकपणे नाहीशी झाली. मुलगी सापडल्याची जेथे जेथे म्हणून किंचितही शक्यता असेल त्या सर्व ठिकाणी पोलिसांनी कसून शोध घेतला. सुमारे साडेतीनशे पोलीस चार दिवस हे काम करत होते. पोलिसांच्या अपयशातून लोकांचे कुतुहल जागृत झाले. हॉलंडला फोन लावण्यात आले. क्रॉइस्टला न्यूयॉर्कला विमानाने ताबडतोब येण्याची निमंत्रणे मिळाली. न्यूयॉर्कला कधीही भेट न दिलेला क्रॉइस्ट हे आव्हानात्मक आमंत्रण स्वीकारताना थोडा गोंधळला. शेवटी त्याने आपल्याकडेच न्यूयॉर्कचा नकाशा आणि मुलीचा फोटो मागवून घेतला.

दुसरे दिवशी फोनवरून त्याने माहिती कळवली. 'न्यूयार्क शहराच्या डाव्या बाजूस रेल्वे रुळाच्या जवळ करड्या रंगाच्या नदीजवळच्या घरात मुलीचे प्रेत आहे. खुनाशी संबंधित माणूस हा बुटका, स्थूल, टक्कल असलेला आणि अमेरिकेबाहेरचा आहे.'

आपले सारे सामर्थ्य पणाला लावूनही पोलिसांना न सुटलेले कोडे क्रॉईस्टने आपल्या दैवी शक्तीने सहजपणे सोडवले. आश्चर्य हे की ह्या माहितीप्रमाणे मुलीचें प्रेत आणि खुनी ज्यावेळी हुडकण्यात आले त्यावेळी ही सर्व माहिती तंतोतंत खरी ठरली. ही शक्ती आपणास कोठून प्राप्त झाली याबाबत मात्र 'दैवी देणगी' या पलीकडे क्रॉइस्ट काही उत्तर देऊ शकला नाही.

पीटर ह्युरॉक याला भावी घटनांची चाहूल लागण्याची शक्ती होती. युरोपमधे 'मानवी रडार यंत्र' अशी त्याची ख्याती होती. भविष्यात घडणाऱ्या घटना तो सहजपणे सांगत असेच पण तेवढ्यावरच न थांबता त्यामध्ये भाग घेणाऱ्या व्यक्ती आणि त्याचा तपशीलही तो देऊ शकत असे.

जंगली जातीमधल्या काहीजणांच्यात ही शक्ती असल्याचे आपण नेहमीच ऐकतो. आदिवासी वन्य जमाती यांच्यामधे असलेल्या या ज्ञानाच्याबद्दल एक कुतूहल सार्वत्रिक असते. हत्तीच्या शिकारीसाठी धंदेवाईकपणे शिकारी नेमून हा व्यवसाय करणाऱ्या एका मातबर व्यक्तीने मनोरंजक अनुभव नोंदवला आहे. हत्तीच्या शिकारीसाठी सुमारे दोनशे मैलाच्या जंगलाच्या परिसरात त्याने आठ शिकारी पाठविले होते. शिकारी आपल्या उद्योगाला निघून गेल्यावर केवळ गंमत म्हणून त्याने चेटूकविद्येत प्रविण असलेल्या त्या जंगलातील व्यक्तीला बोलावले आणि त्या शिकाऱ्यांच्या कामगिरीबद्दल विचारले. बरेच आढेवेढे घेतल्यावर तो तयार झाला. त्याने काटक्यांचे आठ ढीग केले, ते पेटविले त्यामध्ये काही गुळच्या घातल्या त्याचा दुर्गंध सगळीकडे पसरलेला असतानाच कसलेतरी औषध घेऊन त्याने समाधी लावली. सुमारे दहा मिनिटानतर प्रत्येक ढिगाकडे बघून आणि शिकाऱ्याचे नाव घेऊन तो सांगू लागला....याचा मृत्यु तापामुळे जंगलात ओढवला आहे. बंदूक हरवली...याने चार हत्ती मारले. हत्तीचा आकार याप्रमाणे.. याला हत्तीने मारले. त्याची बंदूक मात्र परत येईल. या पद्धतीने आठही ढिगांच्याकडे बघून त्याने भविष्य वर्तविले. मोहिमेचा तीन महिन्याचा काल संपवून ज्यावेळी शिकारी परतले त्यावेळी यापैकी प्रत्येक गोष्ट खरी ठरल्याचे आढळून आले.

वस्तु हलविण्याची ताकद हा या अद्भूत मानसिक सामर्थ्याचाच एक भाग समजण्यात येतो. डॅनियल डग्लस होम या स्कॉच मानसोपचारतज्ञाने मान्यवरांच्या उपस्थितीत जड वस्तू इच्छा शक्तीने जागेवरून हलविणे, स्वतःचे शरीर हवेत तरंगून दाखविणे या गोष्टी करून दाखवल्या आहेत. ज्या रसरसत्या निखाऱ्याजवळ जाणे जमणार नाही ते सहजपणे अनेक मिनिटे हातात धरणे, पाण्यात डोके बुडवावे इतक्या सहजतेने त्यामधे चेहरा बुडविणे हेही प्रयोग त्यांनी जाहीरपणे केले होते.

माणूस मृत्यूनंतर सूक्ष्म देहात प्रवेश करतो. स्वतःच्या शरीराची विशिष्ट प्रकारे समाधी लावून या मृतात्म्याशी संभाषण करणारे काही जण असतात. अशी ताकद आपल्याजवळ आहे असा दावा करणाऱ्या माणसांच्या टेलिव्हिजनवर मुलाखतीही घेतल्या गेल्या आहेत. माणसाचे बाह्यमनाचे कार्य थांबते आणि अबोध मनाची दारे उघडून या सूक्ष्म देहातील संवेदनाशी संपर्क साधता येतो असे याचे शास्त्रीय कारण देतात.

या प्रकारे समाधी लावून मृत व्यक्तीच्या एखाद्या वस्तूकडे बघत त्याची नेमकी

माहिती सांगण्याची अद्भुत ताकद मिसेस् लि ओनोर पायपर या स्त्रीमध्ये होती. अमेरिकेच्या मानसोपचारतज्ञांना ह्या विलक्षण ताकदीचा अनुभव आल्यावर तिला लंडनच्या मानसोपचारतज्ञांनी बोलाविले. लिव्हरपूल विद्यापीठाच्या मानसशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. ऑलीव्हर लॉज यांनी स्वत: या प्रकारची शास्त्रीय तपासणी केली. आपल्या काकांना पत्र लिहून वीस वर्षापूर्वी वारलेल्या त्यांच्या भावाचे सोन्याचे घड्याळ मागवून घेतले.

मिसेस पायपर समाधित गेल्यावर त्यांच्या समोर हे घड्याळ धरण्यात आले. क्षणार्धात त्यांनी ते घड्याळ कोणाचे आहे त्याचे नाव सांगितले. मग त्यांनी त्या व्यक्तीचे वर्णन केले. त्याच्या आयुष्यातील काही ठळक घटना सांगितल्या. या साऱ्या पुराव्याच्या खरेखोटेपणाविषयी डॉ. लॉज यांनी पुन्हा आपल्या काकांना लिहिले. त्यापैकी काही घटना तर त्यांनाही अचूकपणे आठवत होत्या. त्याबद्दल पुन्हा दुसऱ्या काकांना लिहून खात्री करून घेण्यात आली. वीस वर्षापूर्वी वारलेल्या भावाच्या आयुष्यातील ज्या घटना त्यांच्या नातेवाईकांनाही आठवाव्या लागल्या त्या गुप्तपणे मिसेस पायपर यांनी आधीच माहिती करून घेतल्या होत्या हे म्हणणे पटणार नाही. आणि प्रत्यक्ष प्रयोगापर्यंत आपणास कोणती आणि कुणाची वस्तु दाखविणार यांची सुतराम्ही जाणीव मिसेस् पायपर यांना नव्हती.


उत्क्रांतीवाद हे शास्त्रीय सत्य आहे. यामळेच की काय काही प्राण्यांच्यात ही शक्ती दिसून येते. आपल्या मालकाच्या मनातील विचार प्राणी ओळखू शकतात. मालकावर येणाऱ्या संकटाची चाहूलही काही इमानी जीवांना आधी लागते. शेकडो मैल दूरवर असलेल्या मालकाचा मृत्यु त्यांना असलेल्या जागी अस्वस्थ करतो. कुठल्याही प्रकारची पूर्वसूचना नसतानादेखील आपला धनी परत येणार हे काही प्राणी ओळखू शकतात. आपल्या हक्काच्या घरापासून त्यांना शेकडो मैल दूर सोडले तरी संपूर्ण अनोळखी प्रदेशातून मार्ग काढत ते आपले घर नेमके हुडकून काढतात. या सगळ्यांची प्रचिती आजुबाजूच्या जगात आपण नेहमी बघत असतो. यामागची कार्यकारी शक्ती ही कोणत्या प्रकारची आहे हे अर्थातच अजूनही अज्ञात आहे पण ही वस्तुस्थिती आहे हे कसे नाकारता येईल !

लौकिक अर्थाने मृत झाल्यावरही शिल्लक असणारे सूक्ष्म मानवी शरीराचे अस्तित्व हे गृहीत धरले तर त्या पुढची एक गोष्टही तर्कसुसंगत म्हणून मान्य करावी लागते. हा विचारांचा, वासनांचा सूक्ष्मदेह प्रत्यक्ष शरीरापासून माणूस जिवत असतानाही निराळा होऊ शकतो. हा अनुभव जे लोक घेऊ शकतात त्यांच्या मते ते एकत ही दोन निरनिराळी शरीरे एकाच वेळी पाहू शकतात. अंथरुणाच्या बाहेर उभे राहून स्वत:लाच त्यावेळी अंथरुणात बघण्यासारखाच हा प्रकार असतो. हा सूक्ष्म वा अदृश्य देह हा अर्थातच त्वचा, रक्त, कातडी यांचा बनलेला नसतो. आणि त्यामुळेच भिंती अथवा बंद दारांची बंधने त्याला आडवू शकत नाहीत. ज्यावेळी हा

मानसिक देह बाहेर संचार करत असतो त्यावेळी मागे राहिलेल्या शारीरिक देहाचे श्वसनासारखे शारीरिक व्यापार फक्त चालू असतात परंतु मनाचा सर्व कारभार हा सूक्ष्म देहाबरोबर गेलेला असल्यामुळे तो देह विचार करण्यासारखे कोणतेही काम करू शकत नाही. या सूक्ष्म देहाचा प्रत्यक्ष अनुभव त्या कर्याच्या इच्छेप्रमाणे दूरवरच्या व्यक्तींनाही देता येतो. त्या व्यक्तीच्या मानसिक इच्छेप्रमाणे हे शरीर प्रवास करते. शारीरिकदृष्टया निश्चितपणे शेकडो मैलावर असणारा गुरु या पद्धतीने आपल्या सद्शिष्याला भेटू शकतो. शास्त्र म्हणून याचा अभ्यास करणारे शास्त्रज्ञ हे दुसरे शरीर प्रत्यक्ष देह या स्वरुपात अस्तित्वात असते का याबद्दल साशंक आहेत, परंतु तरीही माणसाचे मन त्याच्या शरीराच्या माध्यमातून बाहेर पडून निराळे अस्तित्वात राहू शकते यावर त्यांचा विश्वास आहे. (या संबंधीचा प्रत्यक्ष प्रयोग एकवीस फेब्रुवारीला लोणावळयाचे स्वामी विज्ञानानंद करणार होते. या सूक्ष्म देहाचे अस्तित्व जगाच्या पाठीवरच्या कोणत्याही जिज्ञासु व्यक्तीला देण्याची त्यांची तयारी होती. ऐनवेळी पोलिसांनी बंदी घातल्याने त्यांना हा प्रयोग रहित करावा लागला.)

माणसाचे मन हे हिमनगासारखे मानतात. त्याच्या अदृश्य अशा ७/८ भागात अमर्याद शक्ती लपून बसलेली असते. टेलिपथि, क्लेरोव्हायन्स, भानामती हे व या स्वरुपाचे प्रकार हे या अमर्याद ताकदीचीच अदृश्य स्वरुपे आहेत. काही जणांना ही जन्मजात असते, काहींना आयुष्यात अचानक प्राप्त होते तर काही जण साधनेच्या साह्याने ती मिळवतात.

अनुभवाला आलेल्या घटनावरून बनवलेली ही अनुमाने आहेत. शास्त्र काटेकोर असते. कार्यकारण सिद्धतेच्या सर्व बाजू शास्त्रीय निकषावर घासूनपुसून सिद्ध व्हाव्या लागतात. Parapsychology (पॅरॉसायकॉलजी, अतिमानसशास्त्र) या शाखेला विज्ञानाची शाखा म्हणून अजूनही म्हणावी तशी मान्यता लाभलेली नाही. परंतु इंग्लड, अमेरिका, रशिया, हॉलंड या देशांत विद्यापीठातून या विषयावर संशोधन चालू झाले आहे. भारतात हेमेंद्रनाथ बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखाली राजस्थान विद्यापीठात हा अभ्यास चाललेला आहे.



# चार शास्त्रज्ञ...चार वर्षे...

काही मानसिक रोग काही विशिष्ट भागात, विशिष्ट जमातीत अधिक प्रमाणात आढळतात. अंगात देवता येणे अथवा भुताने झपाटणे या मानसिक विकृती भारतामध्ये जास्त प्रमाणात सापडतात.

देव, देवता अंगात येण्याचे प्रकार स्त्रियांच्यामध्ये अधिक प्रमाणात होतात. आधी एक ते दोन दिवस त्यांची कल्पनाही येऊ शकते. त्या वेळी ती बाई नवऱ्यापासून दूर रहाते. दिवसातून अनेक वेळा आंघोळ करते, उपवास करते आणि फरशीवरच झोपते. नंतर देवी अंगात येते. ती बाई स्वतःचे डोके, खांदे हलवू लागते आणि सर्व चेहराच केसाने झाकून टाकते.

स्त्री या वेळी बेदरकार बनलेली असते. विनयशीलता संपते. कपड्याची काळजीच उरत नाही. केसाच्या मध्यभागी लावलेल्या कुंकवाची रेघ नाकाच्या शेंड्यापर्यंत आलेली असते. हातपाय आणि संपूर्ण अंगाच्या असंख्य हालचाली चालू असतात. ती ओरडते, शिव्याशाप देते आणि वरही देते. एखाद्या देवतेच्या शब्दाप्रमाणे तिची भविष्ये आणि आज्ञा मानल्या जातात. आपल्याहून अनेक वर्षांनी मोठ्या असलेल्यांनाही ती एखाद्या लहान मुलाप्रमाणे वागविते.

रांचीच्या मानसिक रुग्णालयात अकरा वर्षांच्या काळात आलेल्या अशा चारशे रोग्यांचा अभ्यास करण्यात आला. बायकांच्यामध्ये हे प्रमाण अधिक असण्याचे कारण म्हणजे त्या अधिक धार्मिक व अशिक्षित असतात. पुराणातील कथाश्रवणाने आणि उपासतापासाच्या आचरणाने या गोष्टींवरचा त्यांचा विश्वास वाढतो. काही खुळचा कल्पनांवर त्यांची भोळी श्रद्धा चटकन बसते आणि त्यामुळे सारासार विचार करण्याची कुवत संपुष्टात येते.

मानसशास्त्रीय रोगांच्या परिभाषेत याचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करता येईल.

| | | |
|---|---|---|
| Manic Depression | 45 | |
| Schizophrenia | 236 | 400 |
| Paronid States | 78 | |
| Hysteria | 41 | |

यापैकी शेवटच्या प्रकारातले रोगी इस्पितळात येत नाहीत. कारण त्यांना तो रोग वाटतच नाही मुळी. या लोकांच्या अंगात दुर्गा वा काली येते. ते तास बहुधा ठरलेले असतात. या वेळेस त्यांचे व्यक्तिमत्त्व दुभंगते (Dissociation of Personality). ही स्टेज पुढे वाढून ते लोक Paronaid या प्रकारात प्रवेश करतात आणि यानंतर जर रोगी रोगाच्या पुढच्या अवस्थेपर्यंत पोचला तर तो स्वतःलाच

पार्वती वा महादेव समजू लागतो. Manic depression हा प्रकार वरच्या वर्गातील बुद्धिमान लोकांच्यात अधिक आढळतो.

या सर्व विकृती २० ते ३० या वयात आढळतात. साधारणपणे दहा वर्षांच्या आधीचे वा ५० वर्षानंतरचे लोक या प्रकारात क्वचित आढळतात. ८७% रोगी हे २० ते ४० या वयातले असतात. कारण हा मानसिक दृष्टचा सर्वात त्रासाचा कालखंड असतो. रोग्यांच्यापैकी ७५ टक्के विवाहित, ३ टक्के अविवाहित आणि २२ टक्के विधवा वा विधुर असतात. ८० टक्के लोक हे निरक्षर वा अगदी जुजबी शिकलेले असतात. महत्त्व, कीर्ती वा सुरक्षितता याप्रकारे मिळू शकते. या अबोध मनातील जाणीवेने नकळत माणसाचे व्यक्तिमत्त्व या प्रकारांचा आश्रय घेते.

एक प्रातिनिधिक उदाहरण घेऊ. एका अकरा वर्षाच्या मुलीच्या अंगात तिच्या जन्मापूर्वी मेलेला तिचा थोरला भाऊ आला. भावाच्या नावानेच आपल्याला हाक मारायचा आदेश ती सर्वांना देऊ लागली. पाच दिवस देवर्षीकडून उपचार अयशस्वी होऊन तिला मानसिक रुग्णालयात नेण्यात आले.

मुलगी गरीब, अशिक्षित घरची. सहा बहिणी. तिला घरी खूप बोलणी खावी लागत. काम पडे. तू मुलगा असतीस तर, आता तुझ्या लग्नाचे कसे करायचे ! अशी अनेक प्रकारची कटु भाषा सतत कानावर पडे. या साऱ्याचा परिणाम तिच्या व्यक्तिमत्त्वावर न झाल्यासच नवल. औषधे, अनेक मानसशास्त्रीय चाचण्या अनेक वेळा तज्ज्ञांनी केलेली बोलणी E. E. G. या साऱ्यामधून तिच्या आजाराचे स्वरूप स्पष्ट झाले आणि थोड्याच दिवसात ती मुलगी पूर्ववत होऊन घरी गेली. मात्र घरी गेल्यावरही योग्य पद्धतीने तिला वागविण्याचे महत्त्व तिचे अडाणी आईबाप समजू शकले नाहीत आणि मंत्रतंत्र देवर्षी या प्रकारावरची त्यांची श्रद्धाही कमी झाली नाही.

जो देव वा व्यक्ती माणसाला झपाटते त्याचे त्याच्या आयुष्यात महत्त्वाचे स्थान असते. आयुष्यातील अवघड प्रसंगातून त्यामुळेच आपण सुटलो तर सुटू अशी त्याची श्रद्धा असते. हिंदूंच्यात ब्रह्मा आणि दुर्गा सगळ्यात अधिक अंगात येतात. पण जवळचा पीर वा ख्रिस्तही अंगात येऊ शकतो. ख्रिश्चनांच्या अंगात मात्र येशूच येतो तर मुसलमानांच्या अंगात पैगंबर कधीच येऊ शकत नाही. त्यांच्या अंगात येतो फकीर वा पीर.

साऱ्या देवदेवता आणि भुताखेतांचे सत्य असे मानवी आणि मानसशास्त्रीय स्वरूप हे थोडक्यात असे आहे. ◻ ◻ ◻

(' इंडियन जर्नल ऑफ सिकिआट्री ' या जानेवारी ते एप्रिल १९७० या अंकातील वर्मा, श्रीवास्तव, साध्ये, सुब्रह्मण्यम् या चार प्रख्यात मानसशास्त्रज्ञांनी अनेक वर्षांच्या संशोधनातून लिहिलेल्या लेखातील महत्त्वाचा भाग. )



# सोन्यावरचा लाल झुलम!

१९३६ साली स्टॅलिनने आखलेल्या एका धूर्त कल्पनेची तीस वर्षानंतर उघड झालेली कहाणी अलेक्झांडर ओर्लेव्ह या सैनिकानेच सांगितलेली. दोन मांजरांच्या भांडणाची पुनरावृत्ती ...

जिप्सी मधुकान्त

२२ ऑक्टोबर १९३६. या दिवशी संधिकाळाचा धूसर प्रकाश वातावरणात अजून रेंगाळत होता. त्या अस्पष्ट प्रकाशात स्पेनच्या ईशान्य किनाऱ्यावरील कार्ताजेता या बंदरातून आमची मोटर बाहेर पडली. माझ्या शेजारीच स्पॅनिश ट्रेझरीतला एक सर्वोच्च अधिकारी होता. आपली असहाय्यता, बेचैनी, उदासीनता तो चेहऱ्यावरून लपवू शकत नव्हता. आमच्या मागं पाच टनी २० ट्रक्सचा काफिला रोंरावत येत होता. उत्तरेला स्पॅनिश नौदलाच्या दारूगोळ्याच्या कोठाराकडे आमचा मार्ग जात होता. पण तेथले बॉंबगोळे आणि दारूखाना आमच्या हिशेबात नव्हते.

त्याहून अधिक महत्त्वाच्या कामगिरीवर आमची धडक होती.

आमचा काफिला मुक्कामावर पोचला तेव्हा रात्रीचा अंधार दाटला होता. आम्ही दिवाबत्तीची सोय करीपर्यंत, तेथे अभेद्य प्रचंड लाकडी दरवाजे, त्यांना भक्कम पोलादी कांबी आणि संरक्षणाला शिबंदी खडी आहे, हे माझ्या नजरेस आले नाही. एका सशस्त्र सैन्याने तो भला जंबो बोल्ट करामतीने घुमवला आणि एक दुहेरी दार उघडले. आम्ही त्या भव्य गुहेत डोकावले. धुंधल्या प्रकाशाचे अनेक बारीक बल्ब लागले होते. काळोख विरला पण गूढता दाटली.

आमच्या आदेशाची वाट पहात आतमध्ये ६० स्पॅनिश खलाशी उभे होते. भिंती-लगतच एकसारख्या मापाच्या हजारो लाकडी मजबूत पेट्या रचलेल्या. अब्जावधी रुपये किंमतीच्या सोन्याच्या विटा, नाणी त्यात भरलेली !

शतकानुशतके साठवलेला एका प्राचीन राष्ट्राचा तो अमूल्य खजिना होता.

त्यासाठीच मी आलो होतो.

तो सारा छबीना मॉस्कोला हलवण्याची कारवाई होती.

स्पेनमध्ये त्यावेळी अंतर्गत यादवीची चाहूल जाणवत होती. उद्रेक होत होते.

' ऑपरेशन गोल्ड 'ची आमची मोहीम दहा दिवसांची ठरली आणि त्यातले मिनिट न मिनिट हिशेबात धरले होते.

## दोन मांजरांचे भांडण

स्पेनच्या काही रिपब्लिक नेत्यांनी जनरल फ्रॅन्कोच्या नॅशनॅलिस्ट गटाची धास्ती घेतली होती. न जाणो हा खजिना फ्रॅन्कोच्या ताब्यात गेला तर...म्हणून हा सारा खजिना ' सुरक्षित ' ठेवण्यासाठी स्टॅलिनच्या ताब्यात द्यायची रिपब्लिकन नेत्यांनी शक्कल लढवली !

जवळपास ४५० कोटी रु. किंमतीची ती मालमत्ता असावी, असा माझा अंदाज. इतिहासातील ती एक मोठीच दरोडेखोरी गणायला हवी आणि त्यानंतर तीस वर्षे-पर्यंत खूप भुमका आणि अफवांचे पेव फुटत राहिले तरी त्यातले दोघेच साक्षीदार— एक मी आणि दुसरा स्पॅनिअर्ड शिल्लक राहिलो ...

स्पेनमध्ये अंतर्गत यादवी सुरू झाल्यानंतर दोन महिन्यांनी मी माद्रिदमध्ये पाय ठेवला ती तारीख १६ सप्टेंबर १९३६ ची होती. सोविएत गुप्तचर आणि लष्करी तज्ज्ञांचे एक मोठे ' मिशन ' मला संघटित करायचे होते. ' एनकेव्हीडी ' चा एक प्रमुख जनरल या नात्याने स्पॅनिश रिपब्लिकन सरकारचा गुप्तचर-प्रतिगुप्तचर, गुरिल्ला डावपेच इ. बाबतीत मी मुख्य सोविएत सल्लागार होतो. सुमारे दोन वर्षांचे हे मिशन होते. रिपब्लिकन सरकारला आमचा सर्वार्थी पाठिंबा होता.

माद्रिदमधल्या सोविएत दूतावासाच्या सर्वांत वरच्या मजल्यावरून प्रभावी ट्रॅन्समीटरच्या सहाय्याने आमचे प्रक्षेपण चाले.

हे काम सुरू होऊन एक महिना झाला. एके दिवशी माझ्या ऑफिसात कोड-

क्लार्क येऊन थबकला. काखेत कोडबुक आणि हातात एक टेलिग्रॅम होता. 'आताच मॉस्कोहून संदेश आलाय हा, आणि त्यावर पहिलेच शब्द आहेत : 'संपूर्ण गोपनीय' केवळ खूडलाच व्यक्तिशः तो निवेदन करायचा '–क्लार्क म्हणाला.

श्वूड हे माझे संकेतनाम होते. मी तो संदेश उलगडला. निकोलाय येझोवने–एनकेव्हीडीचा सर्वश्रेष्ठ अधिकारी–सुरुवातीला सूचनावजा लिहिले होते, नंतरचा मुख्य मजकूर असा –

"पंतप्रधान लार्गो काबालेरोला सोने रशियात हलवण्याच्या कामी मदत करा. सोविएत स्टीमराचा वापर करा. संपूर्ण गुप्तता राखली पाहिजे. त्यांनी पावती मागितली तर नाकारा–मी पुन्हा रिपीट करतो–' नाकारा '. सांगा की स्टेट बँकेकडून एक औपचारिक पावती मॉस्कोतच दिली जाईल. या सर्व मोहिमेबद्दल व्यक्तिशः तुला मी जबाबदारी सोपवत आहे. ( सही )–इवान व्हासिलेविच. '

ती सही म्हणजे अत्यंत गुप्त कामासाठी क्वचितच वापरले जाणारे स्टॅलिनचे संकेतनाम होते.

## रिपब्लिकन नेत्यांचीच शक्कल

लार्गो काबालेरो आणि त्यांचे प्रामाणिक स्पॅनिश देशभक्त सहकारी हा खजिना स्टॅलिनच्या हाती सोपवायला निघाले होते का ? क्रेमलिनवर त्याचा इतका विश्वास होता का ?

या प्रश्नांची उत्तरे ' होय ' अशी मला आढळली होती !

ही शक्कल देखील स्पॅनिश नेत्यांच्या सुपीक मेंदूतूनच मुळात उगम पावली होती !

माद्रिदभोवती फ्रॅन्को घटाची पकड पक्की दिसत होती. कदाचित् पाडावही अटळ होता. सोनेनाणे इ. सारा खजिना हलवण्याचा औपचारिक आदेश १३ सप्टेंबरला निघाला. गुप्तपणे त्यावर प्रेसिडेंट मानुएल ऑझाना आणि अर्थमंत्री डॉ. जुआँ नेग्रिन यांच्या सह्या होत्या. त्यान्वये अर्थमंत्र्याला, ' त्याच्या दृष्टीने उत्तम संरक्षणाच्या स्थळी ' तो खजिना हलवण्याची मुभा दिली होती. त्यात असेही ध्वनित केले होते की, यथाकाल हे स्थानान्तर संसदेपुढे मांडले जावे. पण हे संसदेसमोर कधीच आले नाही.

या आदेशात कितीही कायदेशीरपणा असला तरी खजिन्याचे राष्ट्रान्तर त्या अर्थात बसले नव्हते. पण लष्करी हालचाली अटळ झाल्या तेव्हा नेग्रिन विकट पेचात होता. त्याने आपला अधिकार लवचिक केला, मनःपूत केला. त्याने सोविएत दूतावासाशी या संदर्भात विचारविनिमय केला. ही घटना केवळ प्रेसिडेंट आणि पंतप्रधान यांनाच माहीत होती. स्टॅलिनपर्यंत ही वार्ता पोचली तेव्हा या घबाडाच्या आशेने त्याचे डोळे लखलखले !

स्टॅलिनचा आदेश मिळाल्यानंतर दोन दिवसांनी आमच्या दूतावासात मी

# घरात पुन्हा पाळणा हलण्यापूर्वी

# विचार करा

**प्रथम पहिल्या मुलीची सर्व तरतूद नीट करायला नको का?**



दूध, सकस अन्न, कपडे, खेळणी पुस्तके व इतर अनेक लहानसहान गोष्टी या सर्वांची निश्चित तरतूद तुम्ही ...साठी करणारच. आणि हे सर्व सोपे नसले तरी कसेही करून तुम्ही ते पुरवाल. पण इतक्यातच आणखी एका ...ची जबाबदारी वाढली म्हणजे ! अशी वेळ येऊ न देणं हेच योग्य नाही काय !

... लक्षावधि जोडपी हेच करीत आहेत. ती परिस्थिति अनुकूल होईपर्यंत दुसरे मूल होणे पुढे ढकलतात. निरोध वापरून तुम्हालाहि हे सहज करता येईल. निरोध हे जगातील फार लोकप्रिय असे, पुरुषांनी वापरायचे खरी संतति-प्रतिबंधक साधन आहे. लक्षात ठेवा पाळणा लांबविण्याचा सर्वात सोपा व बिनधोक मार्ग म्हणजे निरोध अनेक पिढ्यांनी ... यशस्वी रीत्या अनुसरलेला आहे. मग तुम्हीहि निरोध का नाही वापरीत !

... मिळते- फक्त 15 पैशांला 3 (सरकारी मदतीने)-




लांबविण्यास पाळणा, उपाय साधा सोपा आणा

# निरोध ▼

लक्षावधींच्या पसंतीचे साधे. बिनधोक संतति-प्रतिबंधक!

केमिस्ट, वाणी, जनरल स्टोअर्स, पानाची गादी वगैरे अनेक ठिकाणी सहज उपलब्ध.

davp 71/111

नेग्रिनशी वार्तालाप केला. नेग्रिनचा एक सहकारी – फिजिऑलॉजीचा एक प्रोफेसर आणि दुसरा एक नवोढा शासकीय अधिकारी यांनी तात्त्विकदृष्टया कम्युनिझमला विरोध केला होता. पण रशियातला 'भव्य प्रयोगा 'बद्दल त्यांना दुरुन आस्था होती. हा प्रभाव या कारवाईला पुरेसा असावा. शिवाय, हिटलर-मुसोलिनीचा नॅशनॅलिस्ट गटाला पाठिंबा होता. लोकशाही गट तटस्थ होते. अशा परिस्थितीत रशियाशीच दोस्तीचा हात करणे स्पॅनिश रिपब्लिकनांना शक्य होते.

'हा सोन्याचा खजिना आहे तरी कुठे ?'–मी विचारले.

'कार्ताजेनाच्या गुहेत. नौदलाचे तेथे दारुगोळयाचे कोठार आहे.'–नेग्रिनने उत्तर दिले.

## चक्रे फिरू लागली

स्टॅलिनचे नशिब जोरदार होते. याच कार्ताजेना बंदरात सोविएत जहाजे शस्त्रांस्त्रांचा पुरवठा करीत होती. केवळ जहाजेच नव्हे तर विश्वासू असे सोविएतचे मनुष्यबळसुद्धा उपलब्ध होते हाताशी.

या कारवाईत आणखी एका स्पॅनिश ऑफिसरला विश्वासात घेण्यात आले. ही व्यक्ती म्हणजे नौदल आणि वायुसेनेचा मंत्री! भूमध्यसमुद्रातून काळया समुद्रातल्या रशियाच्या ओडेसा बंदरी पोचेपर्यंत त्याच्या युद्धनौकांच्या पहाऱ्याची आम्हाला गरज होती.

त्याच्याशी गुफ्तगू केल्यानंतर त्याने आवश्यक ते हुकूम देण्याचे मान्य केले.

चक्रे वेगाने फिरू लागली. एक बारीकशीसुद्धा अफवेची लहर पसरली असती तर इटाली-जर्मनीला हस्तक्षेप करण्यास ते निमित्त पुरे होते. स्पॅनिश जनतेचा क्रोधावेग पार कोपला असता आणि त्या भडाग्नीत कुणीच शिल्लक राहिले नसते.

नेग्रिनच्या सूचनेनुसार एका उच्च अधिकाऱ्याने आम्हाला कार्ताजेनाचा तपशील पुरवला. सोन्याच्या खजिन्याचा ठावठिकाणा दिला. तेथे १२×१९×७ इंचाच्या दहा हजार पेटयातून प्रत्येकी १४५ पौंड सोन्याचा ऐवज होता. एकूण काहीतरी ७२५ टनाची ती मालमत्ता.

दुसऱ्या दिवशी मी कार्ताजेनाला गेलो. तेथला आमचा नौदलातला अॅटॅची, निकोलाय कुझनेत्सोव हा माझा जुना मित्र. (नंतर दुसऱ्या महायुद्धात तो सोविएत नौदलाचा मंत्री बनला ) कार्ताजेनाला येणारी सर्व रशियन जहाजे शक्यतितक्या लवकर खाली करून माझ्या ताब्यात देण्याच्या मी त्याला सूचना दिल्या. तोवेळपर्यंत एक मालवाहू जहाज बंदरात होते. बाकीच्यांची प्रतीक्षा होती. आम्ही नौदलाच्या स्पॅनिश कमांडरशी चर्चा केली. त्याने ६० खलाशांना माझ्या अखत्यारीत दिले.

गुहेतून त्या सोन्याच्या पेटया जहाजांपर्यंत कशा वाहून आणायच्या, हा माझ्यापुढे प्रश्न होता. दोन आठवडयापूर्वी एका सोविएत टँक ब्रिगेडने कार्ताजेनाहून

निघून ४० मैल दूर आर्चेना येथे तळ दिला होता. तेथल्या कर्नलने त्याच्या सैन्यातले वीस ट्रक उत्कृष्ट ड्रायव्हरसहित माझ्या स्वाधीन केले.

हळू हळू सारी तयारी पूर्ण होत घाट जमून येत होता.

कार्ताजेनाच्या स्टेशनपाशी आमचे ट्रक खडे होते. ड्रायव्हरांच्या अंगावर स्पॅनिश सैन्यातला गणवेश होता. ते साठ स्पॅनिश खलाशो एकदोन तास आधीच गुहेत पाठवून दिले. चार सोविएत जहाजांवरचा काफिला डोळ्यात तेल घालून सज्ज होता. बराच काळपर्यंत 'माल' भरण्याचे काम चालेल असा सर्वांचा अंदाज होता.

अखेर २२ ऑक्टोबरला अंधुक संधिप्रकाशात आम्ही त्या तळाकडे निघालो. ट्रक्स मागून येत होते.

पाणबुडी विभागातले ते साठही खलाशी जवान आणि धट्टेकट्टे होते. प्रत्येक पेटी दोघे मिळून उचलून ट्रकमध्ये चढवीत होते. नेमका अंदाज यावयासाठी प्रत्येक ट्रक-मध्ये ५० पेटयांचीच भरती मर्यादित केली. दहा ट्रक भरून झाल्यावर त्यांची बंदराकडे रवानगी केली. दोन तासांनी ते परत आले. तोवर आणखी पाचशे पेटयांची भरती तयार होती. माझ्या कारमध्ये माझ्यासह आणखी दोघे – एनफे-व्हीडीचा आणखी एक माणूस आणि स्पॅनिश ट्रेझरीचा अधिकारी होते. प्रत्येक काफिल्याची आम्ही सोबत करीत असू.

माल भरतीचे काम सुरळीत चालू झाले.

अखेरीस मी प्रश्न उपस्थित केला, आतापर्यंत मी मोठ्या काळजीपूर्वक त्याला बगल दिली होती–किती सोनं आम्ही जहाजातून न्यायचें ठरले आहे ?'

हा सगळाच मामला अकल्पित चालला होता.

'ओह्. मला वाटते निम्म्यापेक्षा अधिक न्यावे...' असे ट्रेझरी ऑफिसरने उत्तर दिले.

तेही खूपच होते...प्रमाणाबाहेर '

माल भरती आणि वाहतुकीचे काम लागोपाठ तीन रात्री चालले. संध्याकाळी ७ वाजेपासून ते भल्या पहाटेपर्यंत हा उद्योग सुरू असायचा. रात्री कृष्ण पक्षातील होत्या. साराच भयाण अंधार. हेडलाईट्स वापरण्यावर बंदी होती. कधी मधलाच एखादा ड्रायव्हर दिशा चुकून भलतीकडे वळला म्हणजे मागचा कबिलाही भरकटत असे. तसेच आणखीही अडचणी होत्या. स्पॅनिश गणवेश चढवले असले तरी ते नावाला...त्या रशियन ड्रायव्हर्सना एक अक्षर येत नव्हते. स्पॅनिश भाषेचे. समजा असा एखादा भरकटलेला ट्रक कुणी आडवला म्हणजे...? आणि ही कारवाई फुटली तर...दारुण राजकीय शोकांतिका होती. जर्मनांच्या बॉबिंगचीही भीती होती. शिवाय त्या गुहा म्हणजे दारुखानेच होते. क्वचित ठिणगी पडली तर सारा कारभार खाक. आमच्या जहाजांना जलसमाधी देण्याचाही धोका होता. अशा अनेक टांगत्या तलवारी होत्या या सोनेरी मोहिमेत.

## चार रात्रीत तीन चतुर्थांश ऐवज हलवला

दिवसा सरासरी चार तासांची झोप मला मिळे. त्या गुहेतच सोन्याच्या मुद्दे-मालासह साठ खलाशांना बंदिस्त केले जाई दिवसा. त्यांना सँडविच, कॉफी, थंड पेये, फळे इ. दिले जाई. वेळ घालवायला ती मंडळी पत्ते कुटीत असे. मौज म्हणजे एवढे प्रचंड सोने उरापोटी बाळगूनही पत्ते खेळताना ते तांब्याचे छदाम लावत !

तिसऱ्या आणि शेवटच्या रात्रीही दैवाने साथ दिली.

अखेरच्या पहाटे ४ वा.पासून जर्मन बॉबर्स घोंघावू लागली. गुहेतून त्यांचे धक्क्यावरचे बॉबिंग आम्हाला जाणवत होते. परतणाऱ्या ड्रायव्हर्सनी आम्हाला सांगितले की, त्या विमानांनी रशियन जहाजांजवळचेच एक स्पॅनिश मालवाहू जहाज उडवून दिले.

मी ताबडतोब मोहीम आवरती घेऊन शक्य तितक्या लवकर जहाजे बंदरातून बाहेर काढण्याच्या खनपटीस भिडलो.

त्या रात्री अखेरचा ट्रक रवाना झाला तेव्हा मी त्या अधीक्षकाला एकूण आकडा विचारला. ‘मी ७८०० पेट्या मोजल्या. जवळपास तीन चतुर्थांश ऐवज.’ त्याने उत्तर दिले.

२५ ऑक्टोबरला सकाळी १० वाजता अखेरची पेटी अखेरच्या जहाजावर लादली गेली.

माझ्याकडे एक अपरिहार्य पण बेचैन करणारी मागणी लादली गेली—या ऐवजाची पावती द्या !

त्या ट्रेझरी ऑफिसरची तारवटलेली आणि दयार्द्र नजर टाळून मी ती बाब सहज उडवून लावत म्हटले, ‘पावती ? पण दोस्ता, पावती द्यायचा माझा काही अधिकार पोचत नाही. पण हे बघ, तू काही काळजी करू नकोस. या साऱ्या मामल्याची जबाबदारी सोविएत स्टेट बँकेची आहे. तेथे हा ऐवज तपासून, मापून मग योग्य ते केले जाईल, याबद्दल निःशंक रहा.’

तो मनुष्य अवाक् झाला. विजेचा आघातच कोसळला जणू त्याच्यावर. तोंडून शब्द फुटेना. त्याला उमजेना. त्याच्या प्राणाशी खेळ होता. तो माद्रिदला फोन लावेल का ?

टेलिफोनवरून हे प्रकरण चटकर्णी होण्याचा धोका त्याने घेऊ नये, असाच माझा प्रयत्न होता. त्याऐवजी मी त्याला सुचवले की प्रत्येक जहाजावर एकेक ट्रेझरी प्रतिनिधी पाठवा. या सोन्यावर त्यांची अधिकृत मदार राहील. वस्तुतः या तर्काला काहीच धेंडाबुडखा नव्हता ! पण तो अस्वस्थचित्त अधिकारी हे मान्य करायला तयार झाला.

दोन तासांनी जहाजे हाकारली गेली.

मॉस्कोला मी संदेश प्रक्षेपित केला. ओडेसाकडे हा किमती काफिला वाटचाल करीत आहे.

## स्टॅलिनने मेजवानी दिली !

काही काळानंतर येणाऱ्याजाणाऱ्या रशियन हस्तकांकडून मला या मामल्यातले धागेदारे जुळवता येऊ लागले.

मॉस्को आणि कीव्हहून एनकेव्हीडीचे अनेक उच्च अधिकारी ओडेसा बंदरी येऊन थडकले होते. अनेक दिवस भारी बंदोबस्तात एका खास ट्रेनमध्ये त्या पेट्या चढवल्या. गोदी आणि रेल्वेमार्गाचा विस्तीर्ण परिसर कडेकोट सुरक्षित पहाऱ्यात होता. जणू काही शत्रूच्या प्रदेशातूनच ट्रेन जाणार होती !

हा सारा ऐवज मॉस्कोला सुखरूप पोचला.

त्या रात्री स्टॅलिनने एनकेव्हीडींच्या उच्च अधिकाऱ्यांना एक शानदार जंगी मेजवानी बहाल केली ! हा 'कूप' साजरा करण्याबद्दलची ती बिदागी. पोलिट-ब्यूरोचे सारे मेंबर हजर होते. स्टॅलिन एकदम फॉर्मात होता ! बँकावर दरवडा घालण्यापासून आपल्या करिअरला सुरुवात केलेल्या त्या माणसाच्या दृष्टीने हे केवढे घबाड होते !

एनकेव्हीडीच्या प्रमुखाने—येझोवन—माझ्या एका मित्राजवळ स्टॅलिनचे ते हर्ष-भरित उद्गार उद्धृत केले होते—" जसे आपले कान त्यांच्या नजरेला कधी दिसत नाहीत, तसे ह्या सोन्याचे नखही त्यांना पुन्हा दिसणे शक्य नाही !'

खुद्द स्पेनमध्ये अनेकांना हा मामला माहीत होता. पण कुणीही बोलू शकत नव्हते.

आपली घोडचूक त्यांना उमजली असावी, असा माझा अंदाज.

पण ती आता दगडावरची रेघ होती.

आणि गरज सरल्यावर माझ्या बाबतीत, शुद्धीकरणात 'वैद्य' मेला होता !

एक वर्षानंतर नेग्रिनशी वार्तालाप करताना एकदा विषय निघाला. 'वर्षभरा-पूर्वी त्या जहाजांसोबत गेलेल्या आमच्या ट्रेझरी अधिकाऱ्यांची काय खुशाली ?' त्याने विचारले होते. 'अद्यापि ते तिथेच आहेत. मला नवल वाटते, त्या बिचाऱ्यांना का अटकवून ठेवले असावे.' —मी म्हटले.

बऱ्याच काळाने, अंतर्गत यादवी विझल्यानंतरच त्या चौघांचे पाय पुन्हा माय-भूमीला लागले.

माद्रिद कबजात घेतल्यावर फ्रँकोला ही सारी हकीकत कळली असावीच. पण जवळजवळ अठरा महिने त्याच्या शासनाने एक चकार शब्द उच्चारला नाही. स्पेनचे चलन आधीच मेटाकुटीला आले होते आणि ही बातमी फुटली असती तर अर्थव्यवस्था सारी कोसळली असती.

## गुप्त पावतीचे गुपित

पण डिसेंबर १९५६ मध्ये अधिकृत मौन भंगले: नेग्रिनचा मृत्यू झाला होता. त्याच्या खाजगी दप्तरातून सोविएतने दिलेली एक अधिकृत पावती उजेडात आली. त्यानंतर सहा महिन्यांनी 'प्रावदा'त एक खोचक लेख प्रकाशित झाला. त्यात, १९३६ मध्ये स्पेनहून ५०० टन सोने प्राप्त झाल्याची आणि पावती दिल्याची घटना मान्य करण्यात आली होती ! सोविएतकडून खरेदी केलेली विमाने, शस्त्रास्त्रे आणि इतर मदत याबाबत स्पॅनिश रिपब्लिकने दिलेली गहाणवट होती, असे ध्वनित केले होते ! ती काही संपूर्ण खर्ची पडली नव्हती. साडेसदतीस कोटींची बाकी रशियाकडे होती !

पण या जमाखर्चाला पुसते कोण ?

त्या सोन्यावर लाल इलम कधीच चढला होता !

इतरांच्या लेखी ती दंतकथा उरली.

□ □ □

---

# राजस कथा स्पर्धा निर्णय

पुण्याहून प्रसिद्ध होणाऱ्या 'राजस' ह्या ललित मासिकाने ऑगस्ट वर्षारंभ अंकाच्या निमित्ताने महाविद्यालयीन युवक युवतींसाठी एक कथा स्पर्धा आयोजित केली होती. ह्या कथा स्पर्धेमध्ये 'संपूर्ण महाराष्ट्रातून' १४० कथा आल्या होत्या. त्यात पुढील कथालेखकांना पारितोषिके देण्यात आली आहेत.

पहिले पारितोषिक (रुपये १००)

१. विजयशील कुलकर्णी – अहमदनगर.

दुसरे पारितोषिक (रुपये ७५) विभागून

१. दिना गोविन्द मनोहर – पुणे.

२. अंजली गो. बिनीवाले – मुंबई

तिसरे पारितोषिक (रुपये ५०)

१. ज्योति पेंढारकर – मुंबई.

चौथे पारितोषिक (रुपये २५)

१. जयश्री वि. मांडे – अकोला.

उत्तेजनार्थ

१. सौ. संजीवनी देशमुख – यवतमाळ.

२. दिलिप करमरकर – पुणे.

३. रा. वि. कुलकर्णी – मिरज.

# नाझी भस्मासुराचा उदयास्त

छपाई
पूर्ण होत आली.

प्रसिद्धी : १५ ऑगस्ट १९७१

# अजगर फरारी आहे !

पृष्ठ ८ वरून

सापडणार नाही पण अचानक कोणाला तरी कुठेतरी दिसेल तो.

ही बातमी दुसऱ्या दिवशीच्या मुंबईतील वर्तमानपत्रांनी दिली आणि मुंबईत खळबळ माजली असं म्हणतात. ही बातमी ऐकून झाडाझुडपांचा आसरा घेऊन प्रेम करणाऱ्यांची त्यामुळे गैरसोय झाली (बा अजगरा तेरा भी जवाब नही. अगदी रसिक (की अरसिक !) आहेस खरा !) मला वाटले या बातमीमुळे प्राणीसंग्रहालय पहायला येणाऱ्यांच्या संख्येत घबराटीमुळे घट झाली असेल पण छे ! ते अगदी तोबा गर्दीत चालू आहे. कदाचित लोकांतील औत्सुक्य वाढले असण्याचीच शक्यता आहे असे तेथे गेल्यावर वाटू लागले. एकदोघांना प्रश्न विचारले तर त्यांनी त्या-बाबत औत्सुक असल्याचे मान्य केले. हो ! कुठे दिसला तो अजगर तर शोधून दिल्याचे श्रेय मिळेल की, एका सोळा-सतरा वर्षाच्या मुलाने सांगितले की, 'आपण तर सर्व भागात 'बिनदास' (हा मुंबईकरांचा अत्यंत प्रिय शब्द. ही शब्दकोषाला दिलेली अमोल देणगी, याचा अर्थ निर्धास्तपणे) फिरणार. तो अजगर काय करणार डोंबलं. मुंबईत अनेक गारुडी व साधू लोक अजगर अंगावर घेऊन चाळीचाळीतून 'बिनदास' फिरत असतात, मग तो अजगर (म्हणजे पळालेला) काय करणार मला ? आणि तेही खरंच आहे. अजगर हा प्राणी तसा निरुपद्रवी आहे. माणसं त्याला घाबरतात, पण खरं म्हणजे त्यापेक्षा तो माणसांना अधिक घाबरतो. शिवाय हा प्राणी अतिक्रमण वगैरे करणाऱ्या सरपटणाऱ्या जातींपैकी नाहीच. तसेच हा अजगर विषारी (पिंजऱ्यावरही बिनविषारी अशी पाटी आहे) वा चावणाराही नाही. अजगराची जातही अतिमंद असते. मात्र तसा तो प्राणी अति हुशारही आहे (ही दिसलीच की हुशारी) म्हणूनच तो पौर्णिमेच्या रात्री सापडेल ही शक्यता कमीच. सापडलाच तर तो अमावास्येला. माणसे व वर्दळीला घाबरत असल्याने तो रस्त्या-वर गेला असण्याची शक्यताही कमीच. या सर्व कारणांमुळे मीही अगदी 'बिन-दास'पणे (जमल्यास तो दिसल्यास त्याची मुलाखत घेण्याचा 'निर्धार' करून) बागेत फिरत होतो.

अजगराच्या पुढून आल्यास व त्याला डिवचल्यासच तो हालचाल करतो.

प्राणीसंग्रहालयाचे प्राणी विभागाचे प्रमुख अधिकारी डॉ. भा. त्रि. चित्रे यांची भेट घेऊन मी या विषयीची माहिती मिळविली.

हा अजगर कसा फरारी झाला असावा यासबंधी डॉ. चित्रे म्हणाले की, लोखंडाच्या पिंजऱ्याला दुसरी एक जाळी असते आणि रात्री त्या जाळीच्या कोपऱ्यात एखादा उंदीर आला असावा व तो पहाताच (कारण मोठा उंदीर वा घूस म्हणजे अजगराचा जीव की प्राण. पंचपक्वान्नच.) त्यावर झडप मारताच जाळी सटकली

आणि हे साहेब उंदराचा मागोवा घेत तेथून सटकले. अजगर हा प्राणी सुस्त असल्याने तो नेहमीच वेटोळे घालून बसतो. त्यामुळे त्याला एखादे प्रशस्त बीळ मिळाले असेल तरच तो तेथे राहील व असा कोतठेरी असेल तर जरूर दिसेल केव्हातरी. म्हणजे भूक लागताच तो तेथून बाहेर पडेल. (या अजगराला सुमारे अर्धा वा पाऊण किलो वजनाचा उंदीर लागतो व तो खाताच तो सुमारे सहासात दिवस सुस्त पडून असतो. त्यामुळे असे काही झाले तर तो भक्ष्याच्या शोधार्थ बाहेर पडेल) मात्र अजूनही संग्रहालयातील कोंबड्या वा तत्सम पक्षी व ससा यांसारखे प्राणी त्याचे भक्ष ठरले असल्याचे आढळून आलेले नाही. म्हणजे दडून बसला असल्यास तो अजून बाहेर पडलेला नाही. पण जर तो अजगर चुकून गटारात गेला असेल तर मात्र मेला असेल व पुन्हा मिळणे शक्य नाही. कारण तेथील विषारी वायुंमुळे तो बारा तासांवर जगणे शक्य नाही.

त्या अजगराचे वैशिठ्य म्हणजे त्याचे आवडते खाद्य मारून दिले तर तो खाणार नाही. याचे कारण त्याची थोडी उद्योगी प्रवृत्ती. भक्षाला विळखा घालून त्याला ठार मारायचे मग त्याकडे पहात बसायचे आणि मग एक ते दीड तास 'खाना' गिळण्याची मजा चाखायची ही त्याची तऱ्हा. त्याला ससेही आवडतात. एकदा भक्ष खाल्यावर मग सहा सात दिवस सुस्त पडायचे. या काळात रोज फक्त पाणी पिणे एवढाच कार्यक्रम.

१९६३ साली संग्रहालयाने एक वर्षाचा तो अजगर ५० रुपयाला, एका माणसाकडून विकत घेतला. त्यावेळी तो चटपटीत व दिसायला सुंदर होता. कात टाकल्यावरही तो सुंदर दिसे.

आता अस्सल भारतीय जातीचा तो अजगर १५० पौंड वजनाचा, ३ मीटर किंवा सुमारे १० फूट लांबीचा होता व त्याला ५ × ५ फूटाच्या पिंजऱ्यात ठेवले होते. त्याला जोडून असलेल्या दुसऱ्या एका पिंजऱ्यात एक नर व मादी असा तिघांचा परिवार तेथे असायचा व अधून मधून फणे उभारून त्यांचे प्रणयाराधनही चालत असे ! पळालेल्या अजगराच्या त्या दोन्ही साथीदारांना मी पाहिले, बिचारे दोन कोपऱ्यात निपचित पडून राहिले होते. (दुःखी कष्टी असावेत ! )

अजगर पळाल्यावर लोकांचे जे अनेक तर्कवितर्क सुरू झाले व त्यातून काही अनावश्यक टीकाही चालू झाल: की तेथील लोकांनीच तो पैशाच्या लालूचेने विकला असेल किंवा पक्षाघातावरील उपाय म्हणून त्याचे तेल काढण्यासाठी त्याची चोरी झाली असेल पण अशी शक्यता कमी वाटते व हे 'धूड' चोरायला व पळवायला काय साधेसुधे होते. त्याला उचलायलाच दोन तीन माणसे लागत. (१५० पौंड वजन ! ) अशी टीका ऐकली की अधिकारी व नोकर-चाकर बेचैन होतात. कारण त्या मुक्या प्राण्यावर जिवापाड प्रेम करायचे व शेवटी असे उद्गार ऐकायचे.

यात समाधानाची एक गोष्ट म्हणजे अजगर पळाला ही होय. त्याऐवजी नाग-

राज फरारी होते तर तेथील नोकर-चाकरांनाही उद्यान खाली करून उद्याना टाळे ठोकावे लागले असते. (कारण नागराज भयंकर विषारी प्राणी आहेत) मागं एकदा एका चित्याने स्वातंत्र्य उपभोगण्याचा प्रयत्न केला होता व तो हिरवळीवर येऊन बसला होता. पण नंतर तो आज्ञाधारक बालकाप्रमाणे निमूटपणे पुन्हा पिंजऱ्यात दाखल झाला.

४५ एकरांच्या जिजामाता उद्यानात पडलेली एखादी सुई वा टाचणी शोधणे हे ३ मीटर लांबीचे हे अजस्त्र धूड शोधण्यापेक्षा निश्चितच सोपे आहे.

## रुईया-चेतना महाविद्यालयांचा नवा प्रयोग

महात्मा गांधींनी मातृभाषेतून शिक्षण, या कल्पनेचा जोरदार पुरस्कार केला होता.

डॉ. राधाकृष्णन, डॉ. कोठारी व मुदलीयार या शिक्षण आयोगांनीही उच्च शिक्षणासाठी माध्यम म्हणून मातृभाषांच्या उपयोगाला ग्रीन सिग्नल दाखविला होता. देशात भाषेचा व विशेषत: माध्यमाचा प्रश्न समस्याप्रधान बनला आहे. असे असूनही देशातील व महाराष्ट्रातील अनेक विद्यापीठांनी हा प्रयोग करून पाहिला पण आमचे मुंबई विद्यापीठ थोडे अधिक 'कॉंझरवेटिव्ह' असल्याने व देशात या विद्यापीठाचा 'जादा' दबदबा असल्याने ही योजना अनेक वर्षे रेंगाळतच पडली होती. गेल्या वर्षी मुंबई विद्यापीठाने यासंबंधी निर्णय घेतला, पण मुंबईतील सुमारे ५० महाविद्यालयांपैकी फक्त माटुंग्याचे रुईया व वांद्र्याचे चेतना कॉलेज यांनीच मराठी माध्यम सुरू करण्याचे ठरविले.

कै. खेर यांनी इंग्रजीचा खेळखंडोबा करून महाराष्ट्रातील अनेक पिढ्यांचाही खेळखंडोबा केला अशी टीका वारंवार केली जाते. म्हणून या नव्या प्रयोगासंबंधीची माहिती मिळविण्याच्या उद्देशाने रुईयाचे प्राचार्य श्री. कुलकर्णी व उपप्राचार्य श्री. वालसणकर यांची भेट घेतली. त्यांच्याशी बोलण्यापूर्वी माझी अशी अपेक्षा होती की, फारच थोड्या विद्यार्थ्यांनी या योजनेला प्रतिसाद दिला असेल. पण दोनच दिवसांत ॲडमिशन्स बंद करण्याची कॉलेजवर पाळी आली. प्राचार्यांचीही प्रथम अशीच अपेक्षा होती की, फार फार तर ५० ते ६० विद्यार्थी येतील. पण दोन दिवसांत एकूण १४० एस्. एस्. सी. पास झालेल्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी प्रवेश मिळविला. एवढेच नव्हे, सुमारे ६० व त्यापेक्षा जास्त टक्के मिळवलेली मुले व ७९ टक्के मिळवलेली एक मुलगीही त्यात आहे. इतर अनेकांना इच्छा असूनही प्रवेश नाकारावा लागला.

अनेक हुशार मुलांना महाविद्यालयात विषय इंग्रजीतून शिकविण्यात येतो म्हणून समजत नाही किंवा समजला तरी भाषेवर प्रभुत्व नाही, म्हणून चांगल्या प्रकारे विषय लिहिता येत नाही. तसेच शब्द अडले की शब्दकोष पहा व शेवटी शेवटी

तर कंटाळा म्हणून शब्द न समजले तरी चालतील पण शब्दकोश उघडायचा नाही या कारणांमुळे पुढील परीक्षांत अनेकजण उताणे पडतात. शिवाय इंग्रजीत बोलता येत नाही म्हणून शंका असल्या तरी विचारायला घाबरतात व शेवटी मागेच पडतात. पण आता मराठी माध्यमामुळे त्यांना विषय चांगले समजतील, शंका विचारता येतील. विद्यार्थी व शिक्षक यांच्यात संभाषणालाही आता वाव राहील आणि शिक्षकालाही यामुळेच पूर्ण तयारीनिशी वर्गात जावे लागेल. हे फायदे विद्यार्थ्यांना मिळणार आहेत.

यापुढे विद्यार्थ्यांना आपले विचार अधिक चांगल्या रीतीने व चांगल्या भाषेत प्रकट करता आल्याने त्यांच्या गुणांच्या टक्केवारीवर त्याचा परिणाम होईल. पण याचा अर्थ इंग्रजीला डच्चू वा 'अंग्रेजी हटाव' असा नाही. एस्. एस्. सी. ला इंग्रजीत पास झाले असलेच पाहिजे, या अटीवरच प्रवेश दिले गेले आहेत. शिवाय त्या विद्यार्थ्यांचे इंग्रजी चांगले झालेच पाहिजे, या हेतूने त्यांना सहा टयुटोरिअल्स (इंग्रजी माध्यमवाल्यांना ती तीन आहेत) शिवाय संभाषण वर्ग आदि खास प्रयत्न केले जाणार आहेतच. मराठी माध्यमवाल्यांनाही पदवी परीक्षेपर्यंत इंग्रजी हा सक्तीचा विषय रहाणार आहेच. मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांना शिकविण्याची जबाबदारी अनुभवी व तज्ज्ञ प्राध्यापकांवर सोपविण्यात आली आहे. मराठी व इंग्रजी माध्यमासाठी अभ्यासक्रम सारखाच रहाणार आहे. पुणे, नागपूर विद्यापीठांत अगोदरच मराठी माध्यम सुरू झाल्याने ती पुस्तके उपलब्ध आहेतच व रुईया कॉलेजनेही खास व्यवस्था करून ती ग्रंथालयात ठेवली आहेत. विद्यार्थ्यांना सहज विकत घेता यावीत म्हणून कॉलेजमध्ये योग्य ती तजवीज केली आहे.

परिभाषा (टर्मिनॉलॉजी) ही एक महत्त्वाची अडचण असते. पण ती सोडविण्यासाठी सज्ञा व परिभाषा केंद्रही सुरू करण्यात आले आहे. यातूनच योग्य ती पुस्तके भाषांतरीत करणे सोपे जाईल.

वर्षाच्या शेवटी व निरनिराळ्या परीक्षा झाल्यावर दोन्ही माध्यमाच्या विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा आढावा घेतला जाईल. त्यात व पदवी परीक्षेत मराठी माध्यमवाल्यांनी चांगली गती दाखवली तर हा प्रयोग चांगलाच यशस्वी झाला असे म्हणता येईल.

इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेणारे इंग्रजी फार चांगले लिहू–बोलू शकतातच असेही आज दिसत नाही. त्यामुळे नोकरीच्या निमित्ताने होणाऱ्या मुलाखतीत मराठी माध्यमवाले विद्यार्थी कमी पडतील असे कसे म्हणता येईल? असे जरी असले तरी या प्रयोगात इंग्रजी या विषयाबद्दल अधिक श्रम घेऊन व अनुभवाअंती आवश्यक ते बदल मात्र जरूर केले जावेत. तर मराठी माध्यम यशस्वी होणे अशक्य नाही. ज्ञानाची गंगा मातृभाषेतून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याबरोबरच इंग्रजी विषयांबाबत खास प्रयत्न करून जगाची खिडकीही उघडी ठेवणे हेही अगत्याचे आहे.

—प्रतिनिधी

# विनामूल्य

सव्वाशे रुपये किमतीच्या
दहा दर्जेदार पुस्तकांची
विनामूल्य भेट

**माणूसची ५ वर्षांची**
**१०० रुपये वर्गणी**
**भरल्यास**




हीदहा
दर्जेदार पुस्तके
विनामूल्य
भेट मिळतील.

---

**किंवा....**

---

किंवा

# १०० रुपये

पाच वर्षांसाठी
राजहंस प्रकाशन संस्थेकडे

## ठेव म्हणून

ठेवल्यास
सव्वाशे रुपये किंमतीची
सलामी योजनेतील
ही दहा दर्जेदार पुस्तके
ठेवीदारास मिळतील.
आणि
पाच वर्षांनंतर
शंभर रुपयांची ठेवही
परत मिळेल.

पुरंदरच्या बुरुजावरून
झुंड
नाझी भस्मासुराचा उदयास्त
अग्निपुत्र
ज्वाला जेव्हा लाल होते
संध्याकाळ
आणि ड्रॅगन जागा झाला
सांगते ऐका
मुक्ताफळे
प्रभात

# योजनेसंबंधी आणखी थोडे

'साप्ताहिक माणूस'ची पाच वर्षांची शंभर रुपये वर्गणी १५ ऑगस्ट १९७१ पर्यंत भरणाऱ्यास पाच वर्षे 'माणूस' अंक व योजनेतील दहाही पुस्तके मिळतील.

---

'माणूस'चे चालू वार्षिक वर्गणीदार पुढील पाच वर्षासाठी शंभर रुपये वर्गणी भरून या सलामी योजनेत सहभागी होऊ शकतील.

---

पाच वर्षे 'माणूस' वर्गणीचा पर्याय स्वीकारार्ह वाटला तर शंभर रुपये मनिऑर्डरने किंवा ड्राफ्टने 'साप्ताहिक माणूस' या नावे पाठवावे. सोबतच्या पत्रात 'सलामी योजना' असा खुलासा असावा.

---

ठेव पर्याय स्वीकारार्ह वाटला तर शंभर रुपये मनिऑर्डरने किंवा ड्राफ्टने 'राजहंस प्रकाशन' या नावे पाठवावे. सोबतच्या पत्रात 'सलामी योजना' असा खुलासा असावा.

---

रक्कम चेकने पाठवणे सोयीचे असल्यास एक रुपया वटणावळ अधिक पाठवावी.

---

योजनेतील पुस्तके दोन गटात प्रकाशित होतील. पहिला पाच पुस्तकांचा गट डिसेंबर १९७१ अखेर व दुसरा सुमारे पुढील वर्षाच्या मध्यास (जून–जुलै १९७२) वर्गणी-ठेवीदारांच्या हाती पडेल.

---

टपाल व पॅकिंग खर्च वर्गणी-ठेवीदार यांचा राहील.

# सलामी योजनेतील पुस्तके

अंदाजे मूल्य

## पुरंदरच्या बुरुजावरून

ब. मो. पुरंदरे

१०. ००

## झुंड

अनुवाद अनंत भावे

१५.२०

## नाझी भस्मासुराचा उदयास्त

वि. ग. कानिटकर

२५.००

## अग्निपुत्र

वसंत पोतदार

१४. ००

## सांगत्ये ऐका

हंसा वाडकर

८.००

## आणि ड्रॅगन जागा झाला

अरुण साधू

१२.००

## संध्याकाळ

गजानन जागिरदार

८.००

## प्रभात

शरद गोखले

७.००

## मुक्ताफळे

ग्यानबा

१०.००

## व्होल्गा जेव्हा लाल होते

वि. स. वाळिंबे

१८.००

---

साप्ताहिक माणूस / राजहंस प्रकाशन / १०२५ सदाशिव पुणे ३० फोन ५७३५९

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS ( Weekly ) : 50 Paise : Regd. No. M-H 649




"...आता बांगला देशाबाबतची निरनिराळ्या परकीय राष्ट्रांची भूमिका समजावून घ्यायला शिष्टमंडळं पाठवायची का ?"